दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

*(आष्टी) वर्धा *बुधवार, १६ सप्टेंबर २०२६ *वर्ष ४ थे *अंक २२७ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

ग्रामपंचायत निहाय सरपंच पदाच्या आरक्षणासाठी २३ सप्टेंबर रोजी तालुकास्तरावर बैठकीचे आयोजन

वर्धा (जिमाका) : मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील तरतुदीनुसार सन २०२५-२०३० या कालावधीकरीता नागरिकांचा मागासवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील ग्रामपंचायत निहाय सरपंच आरक्षण निश्चित करणे व निश्चित केलेल्या सरपंच पदामधून महिलांसाठी (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) राखून ठेवण्याची कार्यवाही करण्यासाठी तालुकास्तरावर २३ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण निश्चितीबाबत सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत (सरपंच/उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील नियम २-ब च्या पोट नियम (१)व(२) आणि या विषयी ग्राम विकास विभाग, मुंबई यांचेकडील शासन अधिसूचना असाधारण क्र. ४३८ दिनांक १२ ऑगस्ट. २०२६ अन्वये वर्धा जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या प्रवर्गातील सरपंच पदाच्या आरक्षणामध्ये बदल न करता ५० टक्केच्या मर्यादेत नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण या प्रवर्गाकरीता शासन राजपत्रातील अनुसूची-२ मध्ये नमूद केल्यानुसार सन २०२५-२०३० याकालावधीकरीता सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करुन दिलेआहे, असे उपजिल्हाधिकारी तथा ग्राम पंचायत निवडणूक प्रभारी रमा जोशी यांनी कळविले आहे.

राज्यभरात एसटी बसस्थानकांवर १२५ 'हिरकणी कक्ष' उभारले जाणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत टोयोटा किर्लोस्कर मोटरसोबत महामंडळाचा सामंजस्य करार



मुंबई : महाराष्ट्रातील लाखो महिला प्रवाशांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि सन्मानाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेडसोबत १२५ 'हिरकणी कक्ष' उभारण्यासाठी सामंजस्य करार केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उपस्थित होते.

महिलांना, विशेषतः स्तनदा मातांना, प्रवासादरम्यान आपल्या बाळाची काळजी घेण्यासाठी स्वच्छ, सुरक्षित आणि खासगी जागा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत. एसटीच्या बसस्थानकांवर स्तनदा मातांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध झाल्याने महिला प्रवाशांच्या सन्मानात आणि प्रवासाच्या अनुभवात निश्चितच सकारात्मक भर पडणार आहे.

'हिरकणी कक्ष' हा केवळ एक सुविधा प्रकल्प नसून मातृत्वाचा सन्मान, महिलांच्या गरजांची जाणीव आणि प्रवासी-केंद्रित एसटी व्यवस्थेच्या दिशेने टाकलेले संवेदनशील पाऊल ठरणार आहे, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

महिलांसाठी अधिक संवेदनशील आणि सुरक्षित एसटी

एसटी ही केवळ प्रवासाची सेवा नसून महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाशी जोडलेली लोकवाहिनी आहे. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत दररोज लाखो प्रवाशांना सेवा देणाऱ्या एसटीच्या बसस्थानकांवर स्तनदा मातांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध झाल्याने महिला प्रवाशांच्या सन्मानात आणि प्रवासाच्या अनुभवात निश्चितच सकारात्मक भर पडणार आहे.

'हिरकणी कक्ष' हा केवळ एक सुविधा प्रकल्प नसून मातृत्वाचा सन्मान, महिलांच्या गरजांची जाणीव आणि प्रवासी-केंद्रित एसटी व्यवस्थेच्या दिशेने टाकलेले संवेदनशील पाऊल ठरणार आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

आकाराचे प्री-फॅब्रिकेटेड 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत.

या कक्षांमध्ये मातांना स्तनपानासह बाळाची निगा राखण्यासाठी आवश्यक अशी सुरक्षित आणि खासगी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासोबतच आवश्यक फर्निचर, फिक्स्चर, अंतर्गत वायरिंग, विद्युतीकरण तसेच इलेक्ट्रॉनिक साहित्य यांचाही समावेश प्रकल्पात करण्यात आला आहे.

तीन वर्षांत १२५ कक्ष उभारण्याचे नियोजन

सामंजस्य करारामधील नियोजनानुसार तीन आर्थिक वर्षांत एकूण १२५ 'हिरकणी कक्ष' उभारण्याचे उद्दिष्ट टेवण्यात आले आहे. यात २०२६-२७ : ५० कक्ष, २०२७-२८ : ५० कक्ष आणि २०२८-२९ : २५ कक्ष उभारले जातील.

सीएसआर धोरण, उपलब्ध जागा आणि स्थानिक गरजेनुसार या संख्येत आवश्यकतेनुसार बदल करण्याची तरतूदही करारात करण्यात आली आहे.

एसटीची जबाबदारीही निश्चित

या प्रकल्पासाठी एसटी महामंडळाकडून सुमारे ५ मीटर ६५ मीटर जागा उपलब्ध करून देणे, आवश्यक वीज, पाणी आणि स्वापनेसाठी सहकार्य करणे तसेच आवश्यक शासकीय परवानग्या मिळविणे अपेक्षित आहे. प्रकल्प पूर्ण होऊन साहित्य व सुविधा महामंडळाकडे हस्तांतरित झाल्यानंतर कक्षांचे संचालन, सुरक्षा, दुरुस्ती, देखभाल आणि देखरेख करण्याची संपूर्ण जबाबदारी एसटीची राहणार आहे.

विशेष म्हणजे, सामंजस्य करारामध्ये या प्रकल्पासाठी एसटीकडून कोणतेही आर्थिक योगदान राहणार नाही. टोयोटा किर्लोस्करच्या सीएसआर उपक्रमातून हा प्रकल्प राबविला जाणार आहे.

टोयोटा किर्लोस्करच्या सीएसआर निधीतून सुविधा

या प्रकल्पासाठी टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेड आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांतर्गत सहकार्य करणार आहे. सामंजस्य करारानुसार राज्यातील एसटी बसस्थानकांवर अंदाजे ३ मीटर × ३ मीटर

अहंकारी सरकारविरोधात रस्त्यावर उतरावे लागते - आमदार रोहित पवार

वर्ध्यातील आंदोलनात आमदार रोहित पवार यांची भेट

वर्धा : अहंकारी सरकारविरोधात रस्त्यावर उतरावे लागते. गरीब परिवारावरील अन्यायाविरोधात नागरिक एकवटले आहेत. प्रशासनावर दबाव वाढल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गावाला भेट दिली. परिवाराच्या मागण्यांवर प्रशासनाने लिखित निर्णय द्यावा, आंदोलकांची मागणी

- पालकमंत्र्यांनी दुर्वे परिवाराची भेट न घेतल्याचा आरोप
- परिवार दुःखात असताना पालकमंत्री मनोरंजनाच्या कार्यक्रमात सहभागी झाल्याने संताप
- शेतकरी, शेतमजूर आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांवरही सरकारवर निशाणा
- दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी
- पीकविमा आणि अवकाळी पावसाच्या नुकसानभरपाईवरून सरकारला सवाल
- बाध-बिवट्यांच्या वाढत्या हल्ल्यांवर सरकारच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह
- वाघांच्या हालचालीची माहिती देणारी यंत्रणा कुठे? आंदोलकांचा सवाल
- वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या कुटुंबाला शेळ्या-मेंढ्या देण्याच्या भूमिकेवर टीका
- दुर्वे परिवारासाठी जिप्सी गाडी परिवाराच्या मालकीची घावी, मागणी
- परिवारातील एका सदस्याला पर्यटन क्षेत्रात रोजगार देण्याची मागणी
- घरकुल, शिक्षण आणि इतर शासकीय योजनांचा लाभ देण्याची मागणी
- २०१६ पासून प्रलंबित पुनर्वसन प्रस्तावावर सरकारला सवाल
- बफर झोनमधून गावाच्या पुनर्वसनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर
- सरकारच्या आश्वासनांवर आता विश्वास नाही; लिखित निर्णयाची मागणी
- योजनांचा पैसा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप
- मंजूर निधीचा गैरवापर झाल्यास चौकशी करून कारवाईची मागणी

राष्ट्रीय लोक अदालतीत १६६९ प्रकरणाचा आपसी तडजोडीने निपटारा

कौटुंबिक हिंसाचाराच्या ५ प्रकरणांचा लोक अदालतीद्वारे निपटारा प्रकरणांमधील तडजोडीच्या रक्कमेचे मुल्य ३ कोटी ५९ लाख



वर्धा (जिमाका) : राष्ट्रीय विधी सेवा समिती व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा न्यायिक जिल्ह्यामध्ये १२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या अदालतीमध्ये १ हजार ६६९ प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली असुन तडजोड झालेल्या प्रकरणांमधील तडजोडीच्या रक्कमेचे मुल्य ३ कोटी ५९ लाख ९५ हजार ३०५ इतके आहे.

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये दोन्ही पक्षकारांना आपापली बाजु मांडण्याची संधी मिळते तसेच दोन्ही पक्षकारांच्या आपसी सहमतीने प्रकरणांमध्ये तडजोड होत असल्याने निकालाचे समाधान दोन्ही पक्षकारांना असते. तसेच वामुळे पक्षकारांचा वेळ व पैशाची बचत होते. मनासारखा समझोता झाल्याने मानसिक समाधान लोक अदालतमुळे पक्षकारांना मिळते, असे विचार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड यांनी विशेष लोक अदालत प्रसंगी व्यक्त केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव संजीव सरदार यांनी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यामागील भुमिका यात्रसंगी व्यक्त केली. विशेष लोक अदालतीमध्ये निकाली निघणाऱ्या प्रकरणांमुळे पक्षकारांना समाधान लाभते. कारण दोन्ही पक्षकारांच्या आपसी सहमतीने प्रकरणामध्ये समझोता होत असतो. त्यामुळे 'बदापेक्षा समझोता बरा' या विचारानुसार पक्षकारांनी आपसातील वाद सामोपचाराने लोक अदालतीमध्ये मिटवावे, असे आवाहन त्यांनी केले.

विशेष लोक अदालतीमध्ये जिल्हा अधिक्षक संघाचे अध्यक्ष, जिल्हातील अधिवक्ता आणि पक्षकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या राष्ट्रीय लोकअदातीत न्यायालयामध्ये प्रलंबित प्रकरणांपैकी १ हजार ३७३ इतकी प्रकरणे आपसी तडजोडीने काढण्यात आली. सदरहू तडजोड झालेल्या प्रकरणांमधील तडजोडीच्या रकक्मेचे मुल्य १ कोटी ६१ लाख १७ हजार ५५६ इतके होते. तसेच वाद दाखल पुर्व प्रकरणांपैकी २९६ इतकी प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली. वाद दाखल पुर्व प्रकरणांमधील तडजोडीचे मुल्य १ कोटी ९८ लाख ७७ हजार ७४९ इतके आहे.या लोकअदालतीची विशेष बाब म्हणजे जिल्ह्यातील न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या ५ प्रकरणामध्ये पती पत्नी मध्ये असलेले वाद या लोक अदालतीद्वारे निपटारा करण्यात यश प्राप्त झाले व त्यांनी हसत खेळत आपले संसार करण्याचे ठरविले. असल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने कळविण्यात आले आहे.

महावितरणच्या 'ग्राहक समाधान शिबिरा' ला उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंगणघाट : महावितरणतर्फे हिंगणघाट विभागात आयोजित 'ग्राहक समाधान शिबिरात' वीज ग्राहकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. मंगळवार, १५ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या या विशेष शिबिरामध्ये वीज ग्राहकांच्या विविध अडचणींचे जागेवरच तात्काळ व पारदर्शक पद्धतीने समाधान करण्यात आले. विभागात प्राप्त झालेल्या १८० तक्रारींपैकी तब्बल १३८ तक्रारींचे ऑन-द-स्पॉट यशस्वी निवारण करून ग्राहकांना मोठा दिलासा देण्यात आला, तर उर्वरित ४२ तक्रारी देखील पुढील सात दिवसांच्या आत प्राधान्याने सोडवण्याची ग्वाही महावितरणने दिली आहे.

वर्धा मंडलाच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांच्या मार्गदर्शनात आणि हिंगणघाट विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदिप घोरूडे यांच्या नेतृत्वात हिंगणघाट विभागांतर्गत येणाऱ्या अलीपूर, मानकापूर, धोची, रोगाव कुंड, कारंजा चौक, नंदुरी चौक, बस स्टॅन्ड चौक, समुद्रपूर, गिरड, कोरा, कोंढाळी आणि मांडगाव या सर्व प्रमुख शाखा कार्यालयांमध्ये सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत या शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या शिबिरादरम्यान वीजबिलांमधील दुरुस्ती, अचूकता, तांत्रिक अडचणी, नवीन वीज जोडणी, नावात व पत्त्यात बदल, सरासरी बिलांचे निरसन तसेच मीटर बदलणे यांसारख्या ग्राहकांच्या समस्यांचा वरिष्ठ अधिकारी व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत त्वरित निपटारा करण्यात आला. यासोबतच

१३८ तक्रारींचा जागेवरच निपटारा!

अभियंता व सहाय्यक अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक आली.

सदर बैठकीमध्ये शासन निर्णयाप्रमाणे वनविभागामार्फत प्रचलित पध्दतीने देय असलेली २५ लक्ष रुपयांची मदत कुटुंबियांनी स्विकारावी, अशी विनंती करण्यात आली. तसेच आंदोलनकर्त्यांनी मागणी केल्याप्रमाणे आदिवासी विकास विभाग व वनविभाग यांना प्रत्येकी १० लक्ष रुपये याप्रमाणे विशेष बाब म्हणून प्रस्ताव पाठविण्याबाबत व त्याचा पाठपुरावा करण्याबाबत संबंधित विभागास सूचना देण्यात आल्या. आदिवासी विभागामार्फत संबंधित कुटुंबाला आकस्मिक निधी ५० हजार रुपये इतकी मदत देण्याविषयी विनाविलंब कार्यवाही आदिवासी विभागाने करावी.

वनविभागातर्फे मृत व्यक्तीच्या कुटुंबातील व्यक्तीला हंगामी वनमजूर म्हणून घेण्यात येईल. आदिवासी विभागामार्फत असलेल्या न्युक्लिअस योजनेतून बचत गटामार्फत अनुदान निधी ७.५ लक्ष पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल. जेणेकरुन संबंधितास रोजगाराचे साधन निवडता येईल. संबंधित विभागाने पुढाकार घेऊन सर्व अनुषंगिक मदत करावी. वनविभागामार्फत वाघांची वाढती संख्या वावर ठोस उपाययोजना, प्राथमिक प्रतिसाद पथक स्थापन करणे, सर्वेलन्स कॅमेऱ्यांची संख्या वाढविणे, जनजागृती करणे याबाबत वन विभागाने त्वरीत कार्यवाही करावी. आंदोलनकर्त्यांनी किमान वफर क्षेत्रातील शेत रस्त्याच्या दुतर्फा जाळ्या लावण्याची केलेली मागणी पाहता, वन विभागाने पुढील आठवड्यात ग्रामस्थांशी गावपातळीवर बैठक घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सूचना प्राप्त करून घेऊन प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे त्वावर कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले.

ग्रामपंचायत रायपूर जंगली यांच्या मार्फत ग्रामसभेचा ठराव प्राप्त झाल्यानंतर वनविभागामार्फत सविस्तर पुनर्वसनाचा प्रस्ताव

आधार नोंदणी संचाराठी आपले सरकार सेवा केंद्रांकडून अर्ज आमंत्रित

वर्धा (जिमाका) : आधार नोंदणी उपक्रमांचे अधिक बळकटीकरण करण्याकरीता तसेच आधार नोंदणी आणि बायोमेट्रीक अद्यावतीकरण या सेवांचा विस्तार करुन त्यांची उपलब्धता वाढविण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रांना आधार नोंदणी संच वितरीत करण्यात येणार आहे. जिल्ह्यात रिक्त असलेल्या ३ महसूल मंडळासाठी आधार नोंदणी संच वितरीत करण्यासाठी इच्छुक आपले सरकार सेवा केंद्रांनी २५ सप्टेंबर पर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आधार नोंदणी उपक्रमांचे अधिक बळकटीकरण करण्याकरीता तसेच आधार नोंदणी आणि बायोमेट्रीक अद्यावतीकरण या सेवांचा विस्तार करुन त्यांची उपलब्धता वाढविणे विशेषत: ग्रामीण भागामध्ये आधार सेवा अधिक सुलभ करण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयास ईलेक्ट्रॉनिक्स, माहिती व तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेमार्फत आधार नोंदणी संच प्राप्त झालेले आहेत.

ज्या आधार नोंदणी सेवा केंद्रांकरीता आधार नोंदणी संच वितरीत करण्यात येणार आहे. अशा सेवा केंद्राची यादी, अर्जाचा नमुना, अटी व शर्ती, दु.दू.ग्र या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. इच्छुक आपले सेवा केंद्रांनी २५ सप्टेंबर पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाचा सेतु शाखेत विहित नमुन्यात अर्ज सादर करावे, असे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

रायपूर जंगली येथील मृत व्यक्तीचे कुटुंबिय, ग्रामस्थांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

विविध मागण्यांच्या अनुषंगाने सकारात्मक चर्चा

वर्धा (जिमाका) : सेलू तालुक्यातील रायपूर जंगली येथे दि.९ सप्टेंबर रोजी वाघाच्या हल्ल्यात भगवान चंद्रभान धुर्वे यांचा मृत्यू झाला होता. याबाबत कुटुंबिय व गावकऱ्यांचा काही मागण्या होत्या. आज जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्यासोबत जिल्हाधिकारी कार्यालयात कुटुंबिय, त्यांचे नातेवाईक, ग्रामस्थ व इतर मान्यवरांसोबत झालेल्या बैठकीत विविध मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

बैठकीत्र जिल्हाधिकारी वान्मथी सी, मृत व्यक्तीची मुले राजेंद्र धुर्वे, सचिन धुर्वे तसेच शेखर शेंडे, अभ्युदय मेघे, अतुल वांदिले, सौरभ शेळके, पृथ्वीराज शिंदे, निहाल पांडे, ग्रामस्थ, समाजातील व्यक्ती, प्रशासनाच्यावतीने अप्पर जिल्हाधिकारी संजय तेली, उपविभागीय अधिकारी कुश मोटवाणी, बोरचे उपसंचालक मंगेश ठेंगडी तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सायंकाळी जिल्हाधिकाऱ्यांच्या



शासनास सादर करावा. संबंधित कुटुंब हे कच्च्या घरात राहत असल्याने त्यांचे वास्तव्य असलेल्या जागेची पडताळणी करुन त्यांना पट्टा देण्यात येईल. निकषात बसत नसल्यास प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे जागा खरेदीसाठी अर्थसहाय करून संबंधितास घरकुल योजनेचा लाभ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाद्वारे प्रचलित योजनेतून देण्यात येईल.

आंदोलनकर्त्यांनी नमूद केल्यानुसार सदर कुटुंबातील नागपूर येथे शिकत असलेल्या १७ वर्षाच्या मुलाला वस्तीगृह, शिष्यवृत्ती व इतर अनुषंगिक शैक्षणिक लाभ मिळण्याबाबत प्रकल्प कार्यालय आदिवासी विकास विभाग यांनी उचित समन्वय साधून पाठपुरावा करावा.

आंदोलनकर्त्यांच्या मागणीप्रमाणे भविष्यात मदत निधीत वाढ झाल्यास पुर्वलक्षी प्रभावाने ही वाढीव रक्कम कुटुंबियास मिळावी यासाठी वनविभागाने उचित प्रस्ताव निर्णयार्थ शासनास सादर करावा. मुख्यमंत्री व पालकमंत्री यांच्या मार्फत विशेष बाब म्हणून कुटुंबास १० लक्षची मदत मिळण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने दोनही मान्यवरांच्या कार्यालयास कळविण्यात येतील, याबाबत बैठकीत चर्चा झाली. सदर सभेत उपस्थित मान्यवर व मृतकाचे कुटुंबिय यांच्या मागण्यांबाबत सहानुभूतीपूर्वक कार्यवाही करुन शासन निर्णयाप्रमाणे सर्व प्रचलित लाभ यथाशिघ्र प्राप्त करुन देण्यास सातत्यपूर्ण पाठपुरावा करेल, अशी हमी देण्यात आली.

आंदोलनकर्त्यांना आंदोलन मागे घेऊन मृतदेहावर अंत्यसंस्कार तात्काळ करण्याची विनंती प्रशासनामार्फत उपस्थितांना करण्यात आली. त्यावर आंदोलकर्त्यांनी मृतदेहाचे अंत्यसंस्कार करण्यास विलंब होत असल्याने यावर त्वरीत तोडगा निघावा, याबाबत सकारात्मक भुमिका घेऊन प्रशासनाच्या विनंतीस सहमती दर्शविली व कुटुंबियांनी व इतर यांनीही त्यास मान्यता दिली.

संपादकीय

महागाईचे गंभीर आव्हान



कच्च्या तेलाच्या किमती (Crude Oil Prices) वाढल्यामुळे पेट्रोल-डीझेलप्रमाणेच विमान इंधनाच्या किमतीदेखील वाढण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे येत्या काही महिन्यांत प्रवासासह मालवाहतूकही महागणार आहे. याच्या परिणामी सामान्य माणसाच्या खिशाला चिमटा बसू शकतो.

पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे खनिज तेलाचा भाव (Crude Oil Prices) प्रतिपिंप १०५ डॉलरच्या वर गेल्यामुळे, मागील काही दिवसांपूर्वी शेअर बाजाराचा सेन्सेक्स प्रचंड प्रमाणात गडगडला होता. तेलाच्या भडक्यामुळे आगामी काळात भाववाढीचे मोठी वाढ होऊन, त्यात सर्वसामान्यांची होरपळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आशियातील भारतासह अनेक अर्थव्यवस्था या प्रामुख्याने आयात खनिज तेलावर अवलंबून आहेत. खनिज तेलाची किंमत प्रतिपंप १०० डॉलर जाणे, हा या अर्थव्यवस्थेसाठी धोक्याचा इशारा असल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. दुसरीकडे डॉलरवरील अवलंबित्वाला थेट आव्हान देण्याऐवजी, आर्थिक देवाण-घेवाण करताना स्थानिक चलनातील व्यवहारांची पर्यायी व्यवस्था उभी करण्याचा ब्रिक्स देश जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहेत.

ब्रिक्स देशांमधील व्यापार आणि गुंतवणुकीसाठी स्थानिक चलनांचा अधिकाधिक वापर करणे तसेच ब्रिक्स देशांमध्ये व्यापारी व आर्थिक देवाणघेवाण करताना, एकमेकांच्या पेमेंट व्यवस्था परस्परांशी जोडण्याचा व्यावहारिक उपाययोजनांचा गांभीर्याने विचार करण्यावर नुकत्याच नवी दिल्लीत झालेल्या परिषदेत सहमती झाली. त्या दृष्टीने ब्रिक्स पेमेंट टास्क फोर्स प्रयत्न करेल, असे ठरले आहे.

ब्रिक्सच्या आर्थिक सहकार्याला डिजिटल देयकाची जोड दिली पाहिजे. ब्रिक्स सदस्य आणि भागीदार देश आणि परस्परांच्या पेमेंट प्रणाली जोडाव्यात, एकमेकांच्या स्थानिक चलनांमध्ये व्यापार करावा आणि डिजिटल व्यापार अधिक व्यापक करावा. भारतातील यूपीआयवर वर्षाला २५० अब्जांहून अधिक व्यवहार होतात. यूपीआय प्रणालीद्वारे सध्या ११ देशांमध्ये देयके स्वीकारली जातात. सध्या मात्र भूराजकीय तणाव आणि भांडवली बाजारातील अस्तित्वात झालेली मोठी वाढ यामुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास डळमळीत झाला आहे, हे वास्तव आहे.

तेलाचे दर (Crude Oil Prices) वधारल्यामुळे सरकारी तेल वितरण कंपन्यांना पेट्रोलमागे प्रतिलिटर पाच रुपये आणि डीझेलसाठी २३ रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा मोठा तेल आयातदार देश आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर खनिज तेलाच्या भावातील अस्थिरतेचा देशाला मोठा फटका बसतो आहे.

भारताकडून एकूण मागणीपैकी ८८% खनिज तेल आयात केले जाते. पेट्रोल आणि डीझेल बनवण्यासाठी कच्चा माल म्हणून ते वापरले जाते. गेल्या काही महिन्यांत खनिज तेलाच्या भावात सातत्याने वाढ सुरू असल्याने डॉलरमध्ये होणारा तेल आयातीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. याचा परिणाम व्यापार संतुलन तसेच रुपयाच्या मूल्यावर होत आहे.

पेट्रोल-डीझेल आणि एलपीजीच्या किरकोळ दरांत बदल करण्यात आलेले नाहीत. याचा आर्थिक फटका सार्वजनिक क्षेत्रातील तेल व वायू कंपन्यांना बसत आहे.

भारतात पेट्रोल-डीझेलच्या किरकोळ किमती सुमारे तीन महिन्यांपासून स्थिर आहेत. पेट्रोल आणि डीझेलच्या किमतीत शेवटचा बदल २५ मे रोजी झाला. ज्या क्षणी पेट्रोल डीझेलचे दर वाढवले जातील, त्या क्षणी पुन्हा एकदा भाववाढीची उसळी पाहावयास मिळेल.

त्यातच कमकुवत शेअर बाजार आणि परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून समभाग विक्रीचा मारा यामुळे रुपयावर दबाव आला आहे. पश्चिम आशियातील तेलसुविधा आणि जहाजावरील हल्ल्यांमुळे आधीच विस्कळीत झालेली पुरवठा साखळी आणखी कमजोर होण्याचा धोका सध्या निर्माण झाला आहे. या परिस्थितीत अमेरिकेच्या डॉलरच्या तुलनेत रुपया घसरून ९५वर जाऊन पोहोचला आहे.

भारताच्या परकीय चलनसाठ्यात विक्रमी अशी जवळपास ४५ अब्ज डॉलरची वाढ झाली असून, आता या चलनाची गंगाजळी ७८५ अब्ज डॉलरच्या विक्रमी स्थितीत आली आहे. जीडीपीमध्येही लक्षणीय वाढ झाली असल्याचा सरकारचा दावा आहे. देशातील आघाडीचा बाजारमंच असलेला राष्ट्रीय शेअर बाजार, म्हणजेच एनएसईच्या प्रारंभिक समभाग विक्रीबाबतची अनिश्चितता दूर झाली असून, सार्वजनिक भागविक्रीसाठी गुंतवणूकदारांना प्रति समभाग १७०० ते १७८५ रुपयांदरम्यान बोली लावता येणार आहे.

गुंतवणूकदारांना २१ सप्टेंबरपर्यंत आयपीओसाठी बोली लावता येणार आहे. नियामक अडथळ्यांमुळे एनएसई भागविक्री योजना काही काळ रखडली होती. त्यानंतर जवळपास एका दशकाने हा आयपीओ येत आहे. अखेर सेबीची मंजुरी मिळाल्याने २४ सप्टेंबर रोजी शेअर बाजारात आयपीओ येत आहे.

रिझर्व्ह बँकेच्या परकीय चलन स्वॅप सुविधेअंतर्गत उभारण्यात आलेल्या एफसीएनआर(बी) ठेवींमध्ये १२७ अब्ज डॉलर्सचा ओघ आला आहे, हीदेखील सकारात्मक बाबच आहे; परंतु तरीही तेलदरवाढीमुळे चलनफुगवट्याचे आव्हान उभे ठाकल्याची कबुली रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांना द्यावी लागली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची आगामी बैठक ५ ते ७ ऑक्टोबर रोजी पार पडणार असून, त्यावेळी त्यांना बदलत्या पतधोरणाचा विचार करून आपले धोरण ठरवावे लागणार आहे. दुसरीकडे, एल निनोच्या परिणामी पाऊस कमी व अनियमित झाल्यामुळे पीकपाण्यावर विपरीत परिणाम झाला आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यातील खरिपाचे पीक हातातून गेले आहे. याचा राज्यांच्या अर्थव्यवस्थांवर (पैलू घर इंग्मे) ताण येणार आहे. भाववाढीस तोंड देण्याची परिस्थिती गोरगरीब वर्गाची आहे का, याचा सरकारला विचार करावा लागणार आहे.

जनगणनेत ओबीसी ची स्वतंत्र नोंद घेण्याबाबत



आज ओबीसी समाज जनगणनेत ओबीसींची स्वतंत्र नोंद मागतोय याचा अर्थ ओबीसी समाज सरकारला भीक मागत नाही तर आपला हक्क मागत आहे. घटनेने दिलेला हक्क आम्ही मागत आहोत.

आणि तो हक्क आहे, भारताच्या जनगणनेत ओबीसीची स्वतंत्र नोंद.

'ज्याची गणना नाही, त्याची किंमत नाही' ही साधी गोष्ट सरकारला अजून कळलेली नाही. म्हणून आज ओबीसीना रस्त्यावर यावे लागत आहे. २०११ ला शेवटची जनगणना झाली. त्यात एस.सी आणि एस.टी ची जातीनिहाय मोजणी झाली.

पण ओबीसी साठी फक्त 'इतर' हा एकच कॉलम होता. १९८० साली मंडल आयोगाने सांगितले देशात ओबीसी ५२३ आहेत. पण

२०२६ आले तरी आज ४६ वर्षांनी सरकारकडे अधिकृत आकडा नाही.

विचार करा, एखाद्या घरात किती लोक आहेत हेच माहित नसेल, तर त्यांच्यासाठी जेवण, कपडे, शिक्षणाचे नियोजन कसे होणार? देशात ओबीसी किती आहेत हेच माहित नसेल, तर त्यांच्यासाठी योजना कशा बनणार?

आज केंद्रात ओबीसीला २७३ आरक्षण आहे. पण लोकसंख्या ५०ज्ञ असेल तर हे २७३अपूरे आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही ओबीसींचे राजकीय आरक्षण सुप्रीम कोर्टात 'इम्पिरिकल डेटा नाही' म्हणून अडकते.

तो डेटा कुठून आणणार? जनगणनेतूनच ना!

त्यामुळे आरक्षण वाचवायचे असेल तर आधी मोजणी झालीच पाहिजे.

निधी आणि योजना

केंद्राचा ओबीसी साठीचे बजेट, छात्रवृत्ती, पिएम. युवा योजना, नॅशनल ओबीसी फायनान्स कॉर्पोरेशन - या सगळ्याचा निधी कोलकंस्थेवर ठरतो.

आकडा कमी दाखवला की निधी कमी येतो.

आमच्या मुलांच्या शिक्षणाशी, आमच्या तरुणांच्या रोजगाराशी हा खेळ चालू आहे.

कोण मागास आहे हे ठरवण्यासाठी

ओबीसी म्हणजे एक जात नाही. महाराष्ट्रातचतेली, माळी, कुणबी, सुतार, लोहार, घनगर अशा ३००ज्ञ जाती आहेत. यात कोण अजून मागास आहे, कोणाला मदतीची जास्त गरज आहे हे फक्त जातीनिहाय डेटानेच कळेल. नाहीतर क्रीमीलेयरचा नियम सगळ्यांना सारखा लावला जातो. हा अन्याय आहे.

राजकीय प्रतिनिधित्व

लोकशाही म्हणजे 'जितकी लोकसंख्या तितके प्रतिनिधित्व'. पण आज ग्रामपंचायतपासून ते लोकसभेपर्यंत ओबीसींचे प्रमाण लोकसंख्येच्या प्रमाणात नाही. कारण निवडणूक आयोगाकडेही मतदारसंघातील ओबीसी टक्केवारीचा डेटा नाही. हा डेटा आला तरच आम्हाला आमचा वाटा मिळेल.

एस. सी ची मोजणी होते, एस. टी ची मोजणी होते. मग ओबीसीची का नाही?

हा भेदभाव का? देशात ५२ टक्के लोकसंख्या असूनही आम्ही कायदाचार अदृश्य आहोत. ही गोष्ट बदलली पाहिजे.

काही लोक म्हणतात बाबासाहेब फक्त एस. सी, एस. टी साठी होते. हे चुकीचे आहे.

बाबासाहेबांनीच राज्यघटनेचे कलम ३४० लिहून दिले. त्यात म्हटले आहे:

'सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांची चौकशी करून त्यांना न्याय द्या.'

याच कलमामुळे मंडल आयोग आला आणि आज ओबीसींना २७३ आरक्षण मिळते. १९५१ मध्ये जनगणनेतून जात काढली तेव्हा बाबासाहेब म्हणाले होते: 'समस्या नाकारल्याने संपत नाही. आधी मोजा, मगच उपाय करा.'

म्हणून आज ऐबिसी जी मागणी करतोय ती बाबासाहेबांच्या विचारांचीच पुढची पायरी आहे.

सरकार म्हणते 'तांत्रिक अडचण आहे'.

आम्ही विचारतो - चंद्रावर माणूस पाठवू शकता, पण देशातील नागरिक मोजू शकत नाही...?

सरकार म्हणते 'जनगणना २०११ चा डेटा सदोष आहे'. आम्ही विचारतो मग १३ वर्षे तो जाहीर का केला नाही?

बिहार सरकारने २०२३ मध्ये स्वतःचा सर्वे केला. ओबीसी ३ ईबीसी मिळून ६३ निघाले. जर एक राज्य करू शकते, तर १४० कोटींचा देश का करू शकत नाही?

म्हणून केन्द्र सरकारला आमची मागणी आहे की,

२०२१ ची रखडलेली जनगणना त्वरित करा, त्यात ओबीसी साठी स्वतंत्र कॉलम समाविष्ट करा. आलेला डेटा सार्वजनिक करा आणि त्यानुसार धोरणे बनवा.

'सरकारला डेटा मागणे म्हणजे भीक मागणे नाही, तर हक्क मागणे आहे.'

आम्ही बहुसंख्य आहोत. आम्ही करदाते आहोत. आम्ही देश घडवणारे आहोत. म्हणून आमची मोजणी झालीच पाहिजे.

'मोजणी करा, मगच वाटणी करा. आकडा द्या, मगच हक्क द्या.'

गोपालदादा टेंटनकर, ऊमाध्यक्ष
केंद्रीय तेली सेवा संघ, नागपूर.
प्रांतिक तैलिक महासभा, नागपूर
संपर्क - ९५७९३७३८२३

वार्ता विघ्नाची



भाद्रपद शुद्ध चतुर्थीला श्रीगणेशाच्या आगमनावेळी पावसाचा किमान शिडकावा तरी व्हावा, हा महाराष्ट्र भूमीचा निसर्गनियम यंदाही हरितालिका तृतीयेच्या पहाटेपासून सुरू झालेल्या पावसाने पाळला, हे बरे झाले! नाही तर, ऑक्टोबरात असतो तसा उष्मा राज्यभर आतापासूनच जाणवू लागला होता. हा पाऊस टिकणारा नाही, तो एकदोन दिवसांत ओसरणार असा अंदाज आहे. तो चुकला आणि पाऊस पुढले दहा-बारा दिवस राहिला, तर किमान धरणांची स्थिती सुधारण्याची तरी आशा. पण शेतीबाबत-खरिपाच्या हंगामाबाबत तितकेही आशावादी राहाता येत नाही. याचे कारण पिकांच्या ऐन वाढीच्या काळात पावसाने मारलेली दडी. यंदाचे वर्ष 'एल निनो'चे असणार, असा इशारा तज्ज्ञांनी दिल्याने दुष्काळाची शक्यता पावसाळा सुरू होण्यापूर्वीच दिसू लागलेली होती. परंतु आता त्या शक्यतेने जम बसवला. हे साधट गडद होऊ लागले. त्यातही विदर्भ, मराठवाडा आणि मध्य व पश्चिम महाराष्ट्राचा जो टापू सह्याद्रीच्या पर्जन्यछायेचा- म्हणून दुष्काळी ठरतो, तिथे ते अधिक. राज्यातील शेती कोणत्या स्थितीत आहे, याचा सविस्तर ऊहापोह आवश्यक. तेव्हा प्रथम विदर्भावरहल.

कापूस आणि सोयाबीनचा पेरा अधिक असलेल्या विदर्भातील आठ ते नऊ जिल्ह्यांवर यंदा दुष्काळाचे सावट आहे. यंदा गोंदिया, भंडारा व गडचिरोली या धानउत्पादक जिल्ह्यांतच बरा पाऊस झाला. पावसाळ्याच्या प्रारंभी इथे चांगला पाऊस झाल्याने एल निनोचा प्रभाव यंदा जाणवणार नाही असा अंदाज अनेकांनी वर्तवला. प्रत्यक्षात दुसऱ्या टप्प्यात म्हणजे ऑगस्ट व सप्टेंबरच्या प्रारंभी पावसाने दडी मारल्याने शेतातली पिके करपू लागली. गेल्या वर्षीच्या खरीप हंगामात विदर्भात २० लाख आठ हजार हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली. त्यातून १८ लाख ३० हजार टन उत्पादन झाले. यंदा प्रारंभीच्या पावसाला भाळून शेतकऱ्यांनी जवळपास तेवढ्याच क्षेत्रावर सोयाबीन पेरले, पण उत्पादनात किमान ३० टक्क्यांची घट येईल असा अंदाज आताच व्यक्त केला जातो. कापसाच्या पिकाला अद्याप वेळ असला तरी येत्या काळात पाऊस न पडल्यास याताही २० टक्क्यांची घट होईल. गेल्या वर्षाच्या ४० लाख गाठींच्या तुलनेत हे उत्पादन ३२ लाखांवर येईल, अशी भीती व्यक्त होते. विदर्भाच्या अर्थव्यवस्थेतील साठ टक्के वाटा कृषी क्षेत्राचा आहे. यंदा खरिपाचा हंगाम बुडाला तर बाजारपेठेवरही त्याचा मोठा परिणाम दिसून येईल.

पाऊस कमी झालेल्या आठपैकी पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यांत शेतकरी आत्महत्याप्रवण म्हणून ओळखले जातात. हा बऱ्हाडचा प्रांत एरवीही 'कमी पावसाचे क्षेत्र', पण यंदा या भागाच्या सरासरीपेक्षाही पाऊस २५ टक्के कमी झाल्याने यंदा इथे आत्महत्यांचे प्रमाण वाढण्याची भीती आहे. आताच रोज तीन ते चार शेतकरी मृत्यूला जवळ करू लागले आहेत. राज्य सरकारने प्रामुख्याने सोयाबीन पिकाचे पंचनामे करण्याचे काम सुरू केले असले तरी भरपाईपोटी मिळणारी रक्कम फारच उशिरा मिळते व त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही. कमी पावसामुळे यंदा विदर्भातील धरणेही भरलेली नाहीत. याचा फटका रब्बी हंगामाला बसू शकतो. दोन्ही हंगाम हातातून गेले तर जगायचे कसे असा प्रश्न प्रामुख्याने पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांसमोर उभा ठाकणार आहे.

हेही वाचा

अग्रलेख: मिळतिल भूपाल

अमितच

मराठवाडा गोदावरी आणि कृष्णा या दोन खोऱ्यांनी व्यापलेला. गोदावरी नदीला नाशिकमध्ये आलेल्या पुरामुळे जायकवाडी धरण भरले. यामुळे गोदाकाठी दुष्काळझाळा तशा कमी असतील. पण नदीकिनाऱ्यापासून दूर असणाऱ्या मराठवाड्यात उरलीसुरली आशा आहे ती परतीच्या पावसावरच. विशेषत: कर्नाटकाशी जोडून जाणाऱ्या भागात सलग सुमारे ४० वा अधिक दिवस पाऊसच नाही. त्यामुळे आतापासूनच पिके सुकून जाऊ लागली आहेत. धाराशिवमध्ये, मांजरा पट्ट्यातील लातूरमध्ये विहिरी तळाला गेल्या आहेत. जनावरांना पिण्याचे पाणी आणण्यासाठीही आता टँकर लावावे लागतील, असे चित्र आहे. मूग, उडीद ही पिके हाती लागणार नाहीत, हे स्पष्टच दिसत आहे. परतीचा पाऊस चांगला झाला तरी सोयाबीनमधून मिळणारे उत्पादन ४० टक्के घसरलेले असेल. कापसाची लागवड आणि उत्पादन दोन्हीची घसरण सुरूच होती. यात दुष्काळाची भर.

रोजगार ...

आरास मनमोहक
गणपती रोषणाई
महापूर माणसांचा
पहाया झुंबड घाई

निर्बंध मुक्त उत्सव
उत्साह शिगे जाई
दिपून टाकी डोळे
आकर्षक नवलाई

खिसेकापू कार्यरत
चोर बापू ठार्हा ठाई
कळणार ना काही
कशी खिसा धुलाई

रोजगार मिळे चोरा
खाती मस्त मलाई
सामान्य दिगडांची
करत बसा शिलाई

आनंदाला विरजण
कसला विरस होई
वर्गणी दिली मोठी
खर्च नवा पडे डोई

नृत्यांगना थिरकते
अश्लीलउधड होई
कर्मणूक नावाला
पातक बसले डोई

गालबोट नको उगा
नको रे घिसाडघाई
आपणचं रखवाली
सांभाळून रहा भाई

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

धतड धतड ..

ढोल ताशे वाजती
यंदा धतड धतड
निर्बंध मुक्त उत्सव
धुड्डूम धाड धडड

खुले अर्थव्यवस्था
बाजार होई उघड
आडकाठी मुळी न
उत्साह आहे रगड

उर्जा अंगात एवढी
नाचू लागेल दगड
जोशात साजे सण
यंदा भरपूर सवड

उत्सवप्रेमी माणूस
जपेआपलीआवड
आजाराची आता
कमी झालीआकड

काळजी घेण्याची
तरीही असे निकड
आपले हवे बंधन
होऊ नका माकड

उत्सवामागचाभाव
प्रत्यक्ष हवी सांगड
जमवा सुंदर नाती
उत्साहा नकोधोंगड

जराजपावे स्वताला
उत्साहा घाला मुरड
विघ्नहर्ताप्रसन्नचित्त
नको संकटाचींदरड

- हेमंत मुसरीफ पुणे ..
९७३०३०६९९६.

'माझा गाव... माझी माती...

गाव सोडून शहरात कमवायला गेलेली माणसं पुन्हा कधी स्वतःच्या मजीने गावाकडे परतलीच नाहीत... हे वाक्य वाचायला सोपं आहे, पण त्यामागचं दुःख ज्याने अनुभवलंय त्यालाच कळेल.

आमच्या पिढीने गाव पाहिला, गावात जगलो, आणि नंतर पोटाची खळगी भरण्यासाठी शहराचा रस्ता धरला. शहराने हात दिला, काम दिलं, चार पैसे दिले,ओळख दिली . पण त्या चार पैशांच्या बदल्यात काय- काय हिरावून घेतलं, हे आज कळतंय. परतणं आता प्रसंगापुरतंच उरलंय .पूर्वी गावाकडे जाणं हा एक सोहळा असायचा. घरातल्या प्रत्येक व्यक्तीला काही ना काही घ्यायचं असायचं, लहान मुलांकरता काहीतरी मिठाईचा खाऊ घेतला जायचा , सवींना कपड्याची खरेदी असायची, आज गावाकडं परतणं फक्त प्रसंगापुरतं उरलंय. कधी एखादं घरातलं आजारपण आलं , किंवा एखादी शेत तुकड्याची खरेदी आली, किंवा कौलारू घरासाठी गावाकडे आर्थिक मदत देण्यासाठी जाणं,तर कधी लग्नकार्य असेल, तर कधी दिवाळी-सणाला दोन दिवस सुट्टी. मिळाली तर... आणि सगळ्यात वाईट म्हणजे, कधी आपल्याच माणसांच्या अंतिम क्रिया-कर्मासाठी अथवा दशक्रिया विधीसाठी. तर कधी ज्यांनी आई-वडिलांना गावाला ठेवले आहे, त्यांच्यासाठी ! कारण शहरात जागेची अडचण. ज्या अंगणात आपण लहानाचे मोठे झालो, त्याच अंगणात आज आपण पाहुणे म्हणून जातो. घरचं दार उघडं असतं, पण मनात एक भाव आणि चेहऱ्यावर वेगळा भाव असतो, अनोळखीपणा असतो.डशहराने भाकरी दिली, पण... त्या भाकरीसोबत आईच्या हातच्या भाकरीची चव नाही आली. इथे फर्स्ट आहेत, एसी आहे, गाडी आहे, पण गावाकडची मोकळी हवा नाही. तिथे जे होतं ते इथे नाही.गावातली सकाळ म्हणजे पहाटे कोंबड्यांचं आरवणं, चुलीचा धूर, नदीवर किंवा विहिरीवर पोहणे असायचं, किंवा गावात दूध घालणाऱ्या शेतकरी गवळ्याची गडबड,आणि पारावर जमलेली म्हातारी माणसं. शहरातली सकाळ म्हणजे गाड्यांचा हॉर्न, घड्याळाशी स्पर्धा आणि कामाला जाण्यासाठी लोकल किंवा बस पकडायची धावपळ.शहरात शेजारी कोण राहतं हे माहित नसतं, बेळे ञकालेला मदतीला कोणी नसतं,आणि गावाला अख्खं गाव आपलं कुटुंब असतं. एखाद्याच्या घरात अडचण आली तर अख्खा गाव आणि शेजारीपाजारी धावून येतात . आज इथे बाजूच्या फर्स्टटमध्ये कोण आजारी आहे हे कळालं तरी जाणं होत नाही. हरवलेलं बालपण आणी माझं गाव आजही मनात आहे... पण आता ना पारावरच्या गप्पा राहिल्या, ना मंदिरातला काकडा राहिला, ना वडाची किंवा लिंबाची सावली राहिली.



तो पार... जिथे संध्याकाळी सगळे जेष्ठ बसायचे, गावच्या गोष्टी रंगायच्या. मंदिरात संध्याकाळी हरिपाठ चालायचा,त्या वडाच्या ,लिंबाच्या अथवा इतर झाडाखाली आम्ही गोट्या, तीर पारंधी, नागपंचमीला झोकाबांधायचो व उंचावर झोकान्यायची शर्यत लागायची, आंब्यायच्या झाडावरून कैऱ्या तोडायचो. शाळेत जाताना नदीत डुंबायचो, किंवा ओढ्याच्या पाण्यात बांध घालून छोटं धरण बांधायचं व शाळेमध्ये गेल्यानंतर शिक्षकांनी करगोटा तपासून नदीत पोहता म्हणून गुरुजींचा मार खायचा कार्यक्रम नक्की असायचा,आता पार ओस पडलाय. वडाचं लिंबाचं झाड अजूनही उभं आहे, पण त्याखाली बसणारी माणसं निघून गेली. लहानपणीचे मित्र... कोणी मुंबईला, कोणी पुण्याला,तर कोणी परदेशात. व्हाट्सअप युपवर फक्त वाढदिवसाच्या शुभेच्छा पुरते उरलोय आपण.

उरल्या आहेत फक्त आठवणी... आणि त्या आठवणीच कधीतरी डोळ्यात पाणी आणतात.गाव म्हणजे काय? हमन आजही गावाकडे धावतंय, पण आयुष्याच्या या धावपळीत घरी परतायला वेळच उरला नाही...कारण गाव फक्त एक जागा नाही, गाव म्हणजे एक भावना आहे.

गाव म्हणजे मातीशी जोडलेली नाळ ! जिथे आपली नाळ पुरली आहे, ती माती आपल्याला शेवटपर्यंत ओढत राहते.गाव म्हणजे माणुसकी.ङ जिथे पैशापेक्षा माणसाला किंमत जास्त आहे.गाव म्हणजे बालपण.ङ जिथे आपण खोटं-खोटं भांडायचो आणि खरं-खरं रडायचो. किंवा कधी छोटी मोठी मारामारी व्हायची दुसऱ्या दिवशी विसरून जायची.आपलं गाव म्हणजे आयुष्यभर मनात जपलेली एक सुंदर भावना.डशहरात आपण घर भाड्याने घेतो किंवा छोटसं दुमजली घर बांधतो , गावात आपलं घर असतं. हाच फरक आहे. शहरात घरामध्ये एकटॉमी असतो तर गावामध्ये चार- दोन कुत्रे पाळलेले असतात, एखादी मांजर असते व तिची दोन-चार पिल्ले असतात, घरासमोर गोठ्यामध्ये कपिला असते व तिच्या शेजारी एक सुंदर पांढरे वासरू हुंदडत असते, तर दावणीला खिलारी बैलांची जोडी असते. आता गावाकडची सायकल, बैलगाडी हद्दपार झाली आहे. यांची जागा मोटरसायकल अथवा सेकंड हॅन्ड कार ने घेतली आहे. बैलगाडी जाऊन ट्रॅक्टरने जागा घेतली आहे. गावाच्या कडेने महामार्ग गेला आहे. मृत्यूचा महामार्ग बनला आहे. महामार्गावर पावलो पावली धाबे ,बियरबार झाले आहेत. गावाला महामार्ग आल्यापासून गावातील बऱ्याच तरुणांना व ग्रामस्थांना अपघातामध्ये जीव गमवावा लागला आहे, काही जणांना अपघातामध्ये पंगुत्व आले आहे, तर काही तरुणांच्या मृत्यूनंतर मागील कुटुंबाचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे. कुणाच्या जीवनामध्ये कधी काय संकट येईल हे सांगता येत नाही. त्यात भरीतभर बिवट्या ,वाघाची दहशत सर्व गावांमध्ये कायम आहे. कधी मनुष्यबर हल्ला होईल सांगता येत नाही.गावकरी वा शेजारीपाजारी मंडळी सर्व संकटकाळी एकमेकाला मदत करतात हाच तो गावाकडे राहण्याचा फायदा आणि समाधान; शहरातील काही तरुण व गावातील काही तरुण एकत्र येऊन गावच्या विकासासाठी भाग घेत आहेत, शाळा, मंदिरे, पाणी आडवा पाणी जिरवा, विविध प्रकारचे शैक्षणिक कार्यक्रम राबवत आहेत, आता बैलगाड्यांच्या शर्यती रोजच होत आहेत. गाडा एकाचा तर बैल चार जणांचे, तर बैल गाड्या पुढे धावणारी घोडी दुसऱ्याची असते. गाड्यांच्या शर्यती व्हायला आता काय जत्रा- उरूस लागत नाही. कोणत्याही कार्यकर्त्याचा वाढदिवस पकडून बैलगाड्यांच्या शर्यती भरवल्या जातात वरीचशी तरुणाई वेधून होत आहे. त्यामुळे गावोगाव तरुणांचे लग्ने रखडली आहेत. म्हणूनच शेवटी एवढंच वाटतं,--जग कितीही पुढे गेलं, तरी संध्याकाळी जेव्हा सूर्य मावळतो, तेव्हा मन मात्र आई-वडिलांच्या आठवणींने व्याकुळ होते. मन त्या गावाकडच्या वडाच्या किंवा लिंबाच्या झाडाच्या सावलीकडेच धाव घेतं असतं.

लेखक
कैलास गावकवाड । विशेष लेख

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर्स, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. ध्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNINO : MAHMAR/2022/82242

युवा संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाची देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा

बीड माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव धरणाची उंची वाढवण्याच्या निर्णयाविरोधात लढा देणाऱ्या युवा संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाची भेट आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्याशी झाली. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष तथा माजलगावचे नेते डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या विशेष पुढाकारातून ही भेट पार पडली. प्रकल्पग्रस्तांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री महोदयांनी दिली असल्याचे डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी



संगितले.

यावेळी शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांसमोर वस्तुस्थिती मांडली की, माजलगाव धरणाच्या उंची वाढीला २२ गावांचा तीव्र विरोध आहे. सन १९८०-८५ मध्ये धरणासाठी ३० ते ३२ गावांचे पुनर्वसन झाले असून, त्यातील अनेक शेतकरी भूमिहीन झाले आहेत. आता पुन्हा उंची वाढवल्यास माजलगाव, वडवणी आणि गेवराई तालुक्यातील शेकडो हेक्टर सुपीक शेती पाण्याखाली जाणार आहे. धरणाची उंची वाढवण्याऐवजी धरणातील गाळ उपसा करावा किंवा बॅरेजेस बांधण्याचा पर्याय निवडावा अशी मागणी शिष्टमंडळाने केली.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी अत्यंत स्पष्ट भूमिका मांडत, एकाही शेतकऱ्यावर आणि प्रकल्पग्रस्तावर अन्याय होऊ देणार नाही, असे आश्वस्त केले. त्यांनी राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव एकनाथ डवले यांना आदेशित केले की, या संपूर्ण प्रकरणाचा तत्काळ वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. त्यामुळे धरणाची उंची वाढवण्याची कोणतीही पुढील कार्यवाही होणार नाही, हे निश्चित झाले आहे. त्यानंतर शिष्टमंडळाने एकनाथ डवले यांची प्रत्यक्ष भेट घेऊन, प्रशासकीय यंत्रणेला योग्य त्या सूचना देण्याबाबत सविस्तर चर्चा केली.

प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होणार नसल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही - डॉ. ओमप्रकाश शेटे

एकाही शेतकऱ्यावर आणि प्रकल्पग्रस्तावर अन्याय होता कामा नये ही फडणवीस साहेब व सरकारची भूमिका आहे. संबंधित यंत्रणेकडून वस्तुनिष्ठ अहवाल प्राप्त झाल्यानंतर माजलगाव धरण उंची वाढीच्या निर्णयाला स्थगिती मिळेल. मुख्यमंत्री महोदय नवकीच शेतकऱ्यांच्या बाजूने सकारात्मक निर्णय घेतील, यात शंका नाही. मी स्वतः युवा संघर्ष समिती व शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

- डॉ. ओमप्रकाश शेटे
(अध्यक्ष आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती)

खेळाडूंना वाव देत प्रोत्साहान देणारः फुलचंद चाटे



पुणेः शकील मनियार

क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रिडा परिषद पुणे जिल्हा **जिल्हास्तरीय शालेय** क्रिडा अधिकारी कार्यालय **वुशु क्रिडा स्पर्धेत** आयोजित **कु. आर्या सुर्वे अव्वल!**

वुशु क्रीडा स्पर्धा ११ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजक योगेश सुर्वे यांच्या मार्गदर्शना खाली बी.एच.चाटे इंग्लिश मीडियम स्कूल ची इ.७ वीची विद्यार्थिनी कु.आर्या योगेश सुर्वे हिने अंडर १७ वयोगटात, वजन गट ४८ किलोग्रेम मध्ये आपल्या खेळाची उत्कृष्ट चुणूक दाखवत सुवर्ण पदकावर आपले नाव कोरत प्रथम क्रमांक प्राप्त केला तिची अहिल्यानगर येथे २२ सप्टेंबर २०२६ रोजी होणाऱ्या विभागीय वुशू स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेसाठी तांत्रिक कमिटीच्या शिवछत्रपती पुरस्कार विजेते कु. प्रतिक्षा शिंदे, तृप्ती चांदवडकर सह संपूर्ण टिमने स्पर्धा यशस्वी करण्यास मोलाचे कार्य केले. कु.आर्या योगेश सुर्वे हीची विभागीय स्पर्धेत निवड झाल्याने शिक्षकवृंद खेळाडू, नातेवाईक ग्रामस्थ यांनी तिला शुभेच्छा देत स्वागत केले.

पावसाआभावी शिरदाळे परिसरातील बटाटा पीक करपले

उत्पन्नाचे प्रमुख साधन धोक्यात; नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

कैलास गायकवाड/ विशेष प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शिरदाळे परिसरात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने पावसाळी बटाटा पिकाला मोठा फटका बसला आहे. पाण्याअभावी बटाट्याची पाने सुकून करपू लागल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून, बटाटा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शिरदाळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी पावसाळी बटाट्याची लागवड केली होती. वेळ वाचासाचे आगमन उशिरा झाल्याने सुरुवातीच्या टप्प्यातच लागवडीवर परिणाम झाला. त्यानंतर झालेल्या पावसामुळे पिकाची वाढ समाधानकारक झाली होती. मात्र, गेल्या महिनाभरापासून पावसाने पुन्हा ओढ दिल्याने बटाटा पिकाला आवश्यक ओलावा मिळत नसल्याचे चित्र आहे. शिरदाळे परिसर हा डोंगर-पठाराचा भाग असल्याने येथील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाने दडी मारल्याम खरीप पिकांसह बटाटा पिकालाही



त्याचा थेट फटका बसतो. सध्या अनेक शेतांमध्ये बटाट्याची पाने सुकून करपू लागली असून, पिकाची वाढ आणि कंदांची प्रतिकूल वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली असून, बटाटा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शिरदाळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी पावसाळी बटाट्याची लागवड केली होती. वेळ वाचासाचे आगमन उशिरा झाल्याने सुरुवातीच्या टप्प्यातच लागवडीवर परिणाम झाला. त्यानंतर झालेल्या पावसामुळे पिकाची वाढ समाधानकारक झाली होती. मात्र, गेल्या महिनाभरापासून पावसाने पुन्हा ओढ दिल्याने बटाटा पिकाला आवश्यक ओलावा मिळत नसल्याचे चित्र आहे. शिरदाळे परिसर हा डोंगर-पठाराचा भाग असल्याने येथील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाने दडी मारल्याम खरीप पिकांसह बटाटा पिकालाही परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या वर्षभराची मदार असलेल्या बटाटा पिकाला उत्पन्नाचे साधन आहे. बियाणे, खते, औषधे, मशागत तसेच मजुरीवर मोठा खर्च केल्यानंतर पिकाला पाण्याअभावी फटका बसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडण्याची शक्यता आहे. आधीच वाढलेला उत्पादन खर्च आणि त्यात पावसाची अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

गणेशोत्सवानिमित्त प्रभाग क्रमांक २ मध्ये मोफत रुग्णवाहिका सेवेचा शुभारंभ...

शिरूर प्रतिनिधी/ अविनाश घोगरे

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविक तसेच नागरिकांना आपत्कालीन वैद्यकीय मदत तातडीने उपलब्ध व्हावी, यासाठी शिरूर नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक २ मध्ये मोफत रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली. नगरसेविका तथा महिला व बालकल्याण उपसभापती स्नेहलताई गोगेशा शामदार यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला असून, नगरीचे नेते व ज्ञानरुा उद्योजक प्रकाशभाऊ पारिख यांच्या हस्ते रुग्णवाहिका सेवेचे लोकार्पण करण्यात आले. या सेवेद्वारे नगरपालिका रुग्णवाहिका चालक ईश्वरताई अभिजीत पाचर्णे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रभाग क्रमांक २ मध्ये येत्या काही काळापासून विविध सामाजिक व लोकहिताचे उपक्रम राबविले जात आहेत. गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने भाविकांचे व नागरिकांची वर्दळ असते. या पार्श्वभूमीवर आरोग्यविषयक आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत वैद्यकीय सुविधा मिळावी, या उद्देशाने मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी प्रकाशभाऊ पारिख यांनी गणेशोत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देणाऱ्यांची गरज व्यक्त केली. उत्सवाच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या गणेश मंडळांचे त्यांनी कौतुक केले. तसेच प्रभागातील लोकप्रतिनिधी व मंडळांच्या पुढाकारातून सुरू झालेला हा उपक्रम नागरिकांसाठी महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.



नगराध्यक्षा ईश्वरताई अभिजीत पाचर्णे यांनी प्रभाग क्रमांक २ मध्ये सुरू असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. गणेशोत्सवाच्या काळात रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देण्याचा निर्णय नागरिकांच्या दृष्टीने उपयुक्त असून, अशा उपक्रमांमुळे उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

नगरसेविका तथा महिला व बालकल्याण उपसभापती सौ. स्नेहलताई गोगेश शामदार म्हणाल्या, 'गणेशोत्सवाच्या काळात भाविक व नागरिकांना कोणत्याही प्रकारची वैद्यकीय अडचण निर्माण झाल्यास त्यांना तातडीने रुग्णवाहिका उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. प्रभागातील सर्व गणेश मंडळांच्या सहकार्याने ही सेवा सुरू करण्यात आली असून, नागरिकांच्या गरजेनुसार तिचा उपयोग करण्यात येणार आहे.'

या प्रसंगी नगरसेवक अभिजित पाचर्णे, नगरसेवक तथा सभापती, बांधकाम सार्वजनिक समिती सभापती सुनील जाधव, माजी नगरसेवक मुस्ताक कुरेशी, नगरसेवक रविंद्र बोबडे सचिन धारिवाल, मुशाभाई शेख, माजी शिक्षण सभापती तुकाराम खोले, संतोष शिरोळे, जनसेवा ज्येष्ठनागरिक सुधित महाजन, भूमिपुत्र प्रतिष्ठानचे सुशांत कुरे, डॉ. संतोष पोटे, गणेश कोळपकर, बाप्त असोसिएशनचे अध्यक्ष विकास बापू पडवळ, राजकुमार जामदार, डॉ. वैशालीताई साखरे, शीतलताई शर्मा, ऍड. प्रदीप बारस्कर, ऍड. रवींद्र खांदेरे, अविनाश घोगरे, प्रवीण गायकवाड, प्रा. धुमाळ सर, बाळासाहेब जामदार, विजय शिर्के, संतोष शिर्के, संतोष जामदार, संगाजी जामदार, योगेश जामदार, चेतन जामदार, अक्षय शिर्के, शंकर जामदार, शुभम गंगावणे तसेच कुंभार आळी मंडळ, अजिंक्यतारा मंडळ, युवा संघर्ष मंडळ, सिंहगर्जना मंडळ, हनुमान मंडळ व महाराणा प्रताप मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

संजयकुमार वाळके यांना छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार



प्रतिनिधी : बाळासाहेब कुंभार

रांजणगाव गणपती : पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रांजणगाव गणपती येथील आदर्श शिक्षक संजयकुमार वाळके यांना छत्रपती संभाजीनगर मधील वैजापूर येथे वनश्री हॉटेल सभागृहात जिजामाता बहुउद्देशीय संस्थेतर्फे मानाचा छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार अनुपमा भंडारी सचिव लातूर विभाग शिक्षण मंडळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सूर्यकांत मोटे होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व गणेश पूजन करून जिजाऊ वंदना होऊन झाली. यावेळी संदीप जाधव होम मिनीस्टर, माजी गट शिक्षण अधिकारी व बालकवी लेखक धोंडीरामसिंह राजपूत, मारुती देसाई बजाज ऑटो, आयोजक सूर्यकांत मोटे पाटील, मान्यवर व पुरस्कार्थी उपस्थित होते.

यावेळी अनुपमा भंडारी यांनी पुरस्कार आपणास प्रेरणा देतात प्रत्येकाने आपले काम प्रामाणिकपणे करून शिक्षणा बरोबर चांगला माणूस बनवण्याचे काम आपण केले पाहिजे. संजयकुमार वाळके यांना यापूर्वी नेहरू युवा केंद्राचा युवा पुरस्कार, संपर्क फाउंडेशनचा टॉप टिचर २वर्डे मिळालेले आहे .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालकवी धोंडीराम राजपूत यांनी केले तर आभार केंद्रार मोटे यांनी मानले. त्यांना पुरस्कार मिळाले बद्दल रांजणगाव गणपती शाळेच्या मुख्याध्यापिका संगिता पळसकर, केंद्र प्रमुख तानाजी पाटील, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष विवेकानंद फंड, उपाध्यक्ष रमाकांत शेळके, शालेय समिती अध्यक्ष प्रतिभा चते व उपाध्यक्ष अक्षय गलांडे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सुखकर जीवन जगण्यासाठी धम्मपालन करणे गरजेचे आहे !



सातारा : मानवाचा जन्म एखदाच असून सुंदर जगले पाहिजे.स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी.धम्माचे आचरण तंतोतंत पाळले पाहिजे.तरच जीवन दीर्घकाळ व सुखकर होते.असे प्रतिपादन बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर यांनी केले.

महाबळेश्वर नगरपालिकेतील कर्मचारी कालकथीत गौतम लक्ष्मण कांबळे यांचा पुण्यानुमोदनचा कार्यक्रम कासरूड,ता.महाबळेश्वर येथील विहारात संपन्न झाला. तेव्हा समाजप्रबोधन मंडळाचे संस्थापक अनिल वीर बोलत होते.अध्यक्षस्थानी बौद्धाचार्य लक्ष्मण मोरे मोरे होते.वीरसर पुढे म्हणाले, 'कालकथीत कांबळे यांचा स्वभाव समाजशील असाच होता. त्यांच्यामुळे कोणालाही उपद्रव नव्हता.मायेचा झरा कुटुंबाबरोबरच मित्रपरिवारात होता.खरोखरच ते चालते-बोलते व्यासपीठ होते.'

पो.पाटील अमित मोरे म्हणाले,'सर्वांबरोबर सहकार्याने राहून आपले कर्तृत्व सिद्ध केले पाहिजे. गौतम मामा यांनी नाते-गोती चांगल्या पद्धतीने सांभाळली होती.' बौद्धाचार्य अनिल सकपाळ म्हणाले,'धम्माची आचारसंहिता सर्वांनी आचरणात आणली पाहिजे.

तरचदुःखातूनमुक्तहोण्यासमदत होते.' अशोक कांबळे म्हणाले,'समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी बंधुत्वाच्या नात्याने सर्वांनी व्यवहार केला पाहिजे.' असे सांगून त्यांनी मानवाने आयुर्मान वाढविण्यासाठी जीवनशैलीमध्ये बदल करण्याबाबतचे मार्गदर्शन विविध उदाहरणाद्वारे केले.

लक्ष्मण मोरे म्हणाले, 'गौतम कांबळे यांचे व्यक्तिमत्त्व हसतमुख होते.ते सर्वांना मदत करण्यासाठी पुढे असत. युवकांनी कोणत्याही प्रकारचे व्यसन करता कामा नये.' यावेळी ज्येष्ठ नेते डॉ.भीमराव यादव,माजी पंचायत समितीचे सदस्य दशरथ मोरे,संपत मोरे,संतोष मोरे,गोविंद घाडगे,विधिकार कोंडीबा कदम आदींनी आदरांजलीपर मनोगत व्यक्त केली.

प्रारंभी कांबळे कुटुंबियांनी महापुरुषांच्या प्रतिमावरोवरच कालकथीत गौतम कांबळे यांच्याही प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.सदरच्या कार्यक्रमास सरपंच संतोष जंगम,माजी सरपंच यादव,शशिकांत यादव, संतोष जाधव,संजय घाडगे, सखाराम शिर्के, खांडसकर, जाधव, अक्षय कांबळे व त्यांच्या भगिनी, नातेवाईक व आई, प्रकाश कांबळे व संपूर्ण कांबळे भावकी,आदी ग्रामस्थ, तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व त्यांचे शाखा क्र.१,२,३ व ४ चे पदाधिकारी,उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पहाडी पारगाव येथे मांगोबाचा भव्य भंडारा निमित्त ह.भ.प.पांडुरंग महाराज उगले यांची कीर्तनसेवा..

पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा ग्रामस्थांच्या वतीने आवाहन



बीड वडवणी प्रतिनिधी:-

पहाडी पारगाव येथे समस्त गावकऱ्यांच्या सहकार्याने व भक्तिभावाने मांगोबाचा भव्य भंडारा व वारकरी भूषण विनोद वैभव ह.भ.प.पांडुरंग महाराज उगले पर भणीकर यांचे कीर्तनास विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन बुधवार दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी श्री.संकट मोचन दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या प्रांरगणात करण्यात आहे.

या कार्यक्रमात मांगोबाच्या भव्य भंडारा निमित्त भाविकांसाठी महाप्रसादाच्या पंगतीचे आयोजन करण्यात आले आहे तसेच वारकरी भूषण ह.भ.प. पांडुरंग महाराज उगले परभणीकर यांचे रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत जयहरी कीर्तन होणार असून,कार्यक्रमास मृदंगसम्राट ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज खोटे यांची मृदंगसेवा लाभणार आहे. तसेच ह.भ.प. बप्पा महाराज तिगावकर, ह.भ.प. बालासाहेब महाराज रसाळ, ह.भ.प. शिवाजी महाराज नांदे आणि ह.भ.प. विष्णू महाराज चिचवणकर यांची गायनसेवा राहणार आहे.

श्री.संकटमोचन दक्षिणमुखी हनुमान मंदिर प्रांगण,पहाडी पारगाव येथे महाप्रसाद : दुपारी १ वाजल्यापासून आपल्या आगमनापर्यंत.

या धार्मिक सोहळ्यास परिसरातील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मांगोबाचे दर्शन,कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा,असे आवाहन समस्त गावकरी,मौजे पहाडी पारगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

श्री.मांगोबाच्या नावानं चांगभलं...!

राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कारासाठी दयानाथ पवार सर यांची निवड



सातारा/डॉ जीवन मोहिते:

: सापताहिक ब्लॅक ॲंड व्हाईट तर्फे देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कारासाठी श्रीमंत छत्रपती अभयसिंहराजे भोसले विद्यालय सोनवडी रजवडी येथील शिक्षक श्री. दयानाथ एकनाथ पवार यांची निवड करण्यात आली आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न तसेच समाजाभिमुख उपक्रमांचा माध्यमातून त्यांनी केलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असल्याची माहिती निवडपत्राद्वारे देण्यात आली आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्याचा विशेष कार्यक्रम २६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता ठाणे जिल्ह्यातील वर्कुंड सभागृह, गणेश मंदिर संस्थान, फडके रोड, डोंबिवली (पूर्व) येथे आयोजित करण्यात आला आहे. या निवडीबद्दल श्री. दयानाथ पवार यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

गुरुकुल परंपरेचा वारसा जपणाऱ्या ज्ञानतपस्विनीचा गौरव



कोर्टी ता. करांड : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ओहोरात झटणाऱ्या जिल्हा परिषद शाळा कोर्टी, ता. करांड येथील उपशिक्षिका सौ. रूपा संदीप जोशी यांच्या कार्याचा राज्यस्तरावर सन्मान करण्यात आला आहे.

इंडिया २४ न्यूज वेनलच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'महाराष्ट्र एक्सलन्स राज्यस्तरीय अवॉर्ड' त्यांना नुकताच प्रदान करण्यात आला. हा भव्य पुरस्कार सोहळा शाहू महाल भवन, रूपा संदीप जोशी वाजेपर्यंत त्या दरबार चौक, कोल्हापूर येथे दि. १३ सप्टेंबर रोजी संपन्न झाला. प्रसिद्ध अभिनेते पीलीमा हे यांच्या हस्ते हा सन्मान देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

सुट्टी न घेता सुरू असलेला ज्ञानयज्ञ आणि वज्रासची परंपरा

सौ. जोशी मॅडम यांचे कार्य केवळ कोर्टी गावापुरते मर्यादित नाही. यापूर्वी त्यांनी सेरे येथे तब्बल १० वर्षे सेवा बजावली असून तेथेही त्यांचे अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत.

कोर्टी येथे रुजू झाल्यापासून त्यांनी आपली ही यशाची परंपरा कायम ठेवली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत तब्बल २४ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले असून, २ विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे.

गेली सलग तीन वर्षे त्यांनी दिवाळी व मे महिन्याची एकही सुट्टी विद्यार्थ्यांना दिली नाही व स्वतःही घेतली नाही. त्या स्वतः कोर्टी गावातच राहत असल्याने शाळेव्यतिरिक्त शेष तीन तास जादा वेळ देत, प्रसंगी सकाळी ७ उपस्थित होते.

यावेळी अनुपमा भंडारी यांनी पुरस्कार आपणास प्रेरणा देतात प्रत्येकाने आपले काम प्रामाणिकपणे करून शिक्षणा बरोबर चांगला माणूस बनवण्याचे काम आपण केले पाहिजे. संजयकुमार वाळके यांना यापूर्वी नेहरू युवा केंद्राचा युवा पुरस्कार, संपर्क फाउंडेशनचा टॉप टिचर २वर्डे मिळालेले आहे .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालकवी धोंडीराम राजपूत यांनी केले तर आभार केंद्रार मोटे यांनी मानले. त्यांना पुरस्कार मिळाले बद्दल रांजणगाव गणपती शाळेच्या मुख्याध्यापिका संगिता पळसकर, केंद्र प्रमुख तानाजी पाटील, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष विवेकानंद फंड, उपाध्यक्ष रमाकांत शेळके, शालेय समिती अध्यक्ष प्रतिभा चते व उपाध्यक्ष अक्षय गलांडे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

गणेशोत्सव देखाव्यातून तिसरी मुंबई विरोधात जनजागृती.

शहरी आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शवून शेती जमीन न विकण्याचे आणि सरकारच्या तिसरी मुंबई प्रकल्पाच्या विरोधात लढण्याचे केले आवाहन.

उरण(विट्ठल ममतावादे)राज्य सरकारच्या तिसरी मुंबई विरोधात उरण पनवेल पेण तालुक्यातील १२४ गावातून प्रखर विरोध केला जात आहे. सरकारने भूसंपादन प्रक्रिया सुरू केल्यापासून या विरोधकाला अधिक गती मिळाली आहे. एकीकडे सरकार तिसरी मुंबईचा हट्ट कायमठेवत आहे तर दुसरीकडे शेतकरी संघटना १२४ गाव पिंजून काढत विरोधाची धार वाढवत आहेत. आता हा विरोध गणपती देखाव्यातून पाहायला मिळत आहे. याद्वारे तिसरी मुंबईला कोणत्याही प्रकारे जमीन न देण्याची व तरुण पिढीला या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे.

एमएमआरडीए केएससी नवनगर तिसरी मुंबई विरोधी शेतकरी समिती रायगड चे सरचिटणीस रूपेश पाटील यांनी गणपती देखाव्यातून शहरी आणि ग्रामीण जीवनातील फरक दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. एक शेतकरी गणपती बाप्पाला आवाहन करत असून तिसरी मुंबईतून हद्दपार झाली तर तुझे सण आणि उत्सव कसे साजरे करणार अशी आर्त विनवणी करत आहे. मुंबई नवी मुंबईत स्थानिक आगरी कोळी कराडी कुणबी समाज भूमिहीन होऊन उध्वस्त झाला असून उपऱ्यांनी हातपाय पसरले आहेत. त्यांनी स्थानिकांचे सामाजिक व राजकीय स्थान धोक्यात आणले आहे. शहरांमुळे स्थानिक मुख्यमंत्री फडणवीस आपल्या जन्मभूमी नागपूरात दुसरे नागपूर तिसरे नागपूर उभे करतील का असा प्रश्न केला जात आहे. या देखाव्यातून शेती जमीन घरे आणि गावे समाजसंस्कृती बोलीभाषा व्यवसाय रोजगार यावर परप्रांतीयांचे आक्रमण झाले आहे. शहरातील सिमेंटची जंगले, टॉवर संस्कृतीमुळे नागरी सुविधावर ताण पडतो. याशिवाय गुन्हेगारी फोफावली असल्याचे मुंबईत नवी मुंबईत बघायला मिळते.

श्रीमंतांना मोकळा श्वास देण्यासाठी तिसरी मुंबई उभारण्याच्या सरकारी धोरणाने ग्रामीण शेतकरी उध्वस्त होणार आहे. उदरनिर्वाहाची शेती काढून त्यांचा श्वास कोंडवणारी कृत्रि सरकारची असून मुंबईतील गर्दी कमी करण्याचा हा प्रयत्न फसलेले आहे. शहरांमुळे स्थानिक वाचवण्यासाठीच्या लढाईत जेन झी आणि जेन अल्फा पिढीने आपल्या भविष्य डोळ्यासमोर ठेवून उतरण्याचे आवाहन केले आहे.

तिसऱ्या मुंबई विरोधात सहभागी होण्याची सुबुद्धी गणपती बाप्पाने शेतकरी आणि युवा पिढीला द्यावी अशीही साद घालण्यात आली आहे. सेझ आंदोलनातील प्रमुख मार्गदर्शक दिवंगत माजी न्यायमूर्ती पी बी सावंत, लोकनेते दत्ता पाटील, कॉम्रेड विलास सोनावणे यांचे स्मरण करण्यात आले आहे. याशिवाय सेझ आंदोलनातील मार्गदर्शक आणि तिसरी मुंबई विरोधी लढ्याचे प्रमुख मार्गदर्शक माजी न्यायमूर्ती बी जी कोळसे पाटील यांनाही देखाव्यात स्थान दिले आहे. तिसरी मुंबई विरोधातील शेतकऱ्यांच्या लढ्याला महाराष्ट्रातील अनेक नामांकित वृत्तपत्रांनी प्रसिद्धी दिली त्या सर्व वृत्तपत्रांच्या बातम्यांची कात्रणे देखील देखाव्यात लावण्यात आली आहेत.



तळेगावात रंगली दा

अल्लीपूर परिसरात कॅन्सरच्या वाढत्या रुग्णसंख्येने चिंता..!

दशकभरात अनेकांचा मृत्यू; जनजागृतीसह मोफत तपासणी शिबिराची मागणी

गौळ (वार्ताहर) : देवळी पुलगाव मतदार संघातील अल्लीपूर व परिसरात कॅन्सरच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याची चिंता ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. गेल्या दशकभरात या गंभीर आजारामुळे अनेक रुग्णांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत असून, या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने परिसरातील परिस्थितीचा गांभीर्याने आढावा घेऊन व्यापक जनजागृती व तपासणी मोहीम राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.

अल्लीपूर हे परिसरातील अनेक गावांसाठी मध्यवर्ती ठिकाण आहे. या भागातील गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांतील व्यक्तींना कॅन्सरसारख्या गंभीर आजाराचे निदान झाल्यानंतर उपचारासाठी मोठा आर्थिक खर्च करावा लागतो. त्यामुळे एका व्यक्तीच्या आजाराचा परिणाम संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीवर होत असल्याचे चित्र आहे.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी माजी पंचायत समिती सदस्य अशोक सुपारे व ग्रामपंचायत सदस्य सतीश काळे यांनी अल्लीपूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल रूहीकर यांची भेट घेतली. यावेळी परिसरातील कॅन्सरग्रस्त रुग्णांची सद्यस्थिती, आजाराच्या संभाव्य कारणांबाबत तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

नागरिकांमध्ये कॅन्सरची प्राथमिक लक्षणे, नियमित आरोग्य तपासणी, वेळेत निदान आणि तंबाखूजन्य पदार्थांसह विविध व्यसनांपासून दूर राहण्याबाबत जनजागृती करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. तसेच अल्लीपूर व परिसरात कॅन्सर तपासणी व जनजागृती शिबिर आयोजित करण्याच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा झाली.

लवकर निदान झाल्यास उपचाराची शक्यता वाढते. त्यामुळे केवळ आजार वाढल्यानंतर उपचार करण्याऐवजी प्रतिबंध आणि वेळेवर तपासणीवर भरदेणे आवश्यक आहे. अल्लीपूरसह परिसरातील नागरिकांसाठी लवकरात लवकर मोफत कॅन्सर तपासणी व जनजागृती शिबिर आयोजित करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



गणरायाच्या साक्षीने रक्तदानाचा महायज्ञ; ग्रामस्थांचा उस्फूर्त सहभाग

सातारा, डॉ जीवन मोहिते: सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, जांभळेवाडी यांच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान व डोळे तपासणी शिबिराला ग्रामस्थांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिलांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले, तर ज्येष्ठ नागरिकांनी डोळ्यांची तपासणी करून घेत आरोग्याविषयी जागरूकता दाखविली.

वरद चॅरिटेबल ट्रस्ट, बालाजी ब्लड सेंटर तसेच श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन लायन्स आय हॉस्पिटल, सांगली यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या उपक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती होण्यास मोठी मदत झाली.

उरमोडी धरणामुळे पूर्णवसित झालेल्या जांभळेवाडी गावात गेल्या अनेक वर्षांपासून 'एक गाव – एक गणपती' ही परंपरा जपली जात आहे. गावातील एकमेव सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून संपूर्ण गाव एकत्र येऊन उत्सव साजरा करतो. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वजण उत्सवात सहभागी होत असून तरुण कार्यकर्ते विविध उपक्रमांच्या आयोजनात सक्रिय भूमिका बजावत आहेत.

दरवर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविले जातात. यंदा रक्तदान व डोळे तपासणी शिबिरा सोबतच महिला व बालकांसाठी विविध खेळ व स्पर्धा, तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी भजन-कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

गणेशोत्सवामुळे गावात यात्रेसारखे उत्साही वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थ सहकार्याने हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या उपक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती होण्यास मोठी मदत झाली. उरमोडी धरणामुळे पूर्णवसित झालेल्या जांभळेवाडी गावात गेल्या अनेक वर्षांपासून 'एक गाव – एक गणपती' ही परंपरा जपली जात आहे. गावातील एकमेव सार्वजनिक गणेशोत्सव एकोप्याचा, सांस्कृतिक मूल्यांचे जतन करत जांभळेवाडीचा गणेशोत्सव वंदाही शांततेत, उत्साहात आणि एकोप्याचा वातावरणात साजरा होत आहे.



विघ्नहर्ता पतसंस्था निघोज शाखेचे नवीन जागेत स्थलांतर समारंभ कार्यक्रम गुरुवर्य ह.भ.प सरकटे महाराज यांच्या शुभ हस्ते संपन्न



निघोज / प्रतिनिधी

मुख्य कार्यालयासह इतर ५ शाखा मिळून पुणे व नगर जिल्हयातील सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या विघ्नहर्ता ग्रामीण सहकारी पतसंस्थेच्या निघोज शाखेचा नवीन इमारतीमध्ये स्थलांतर कार्यक्रम समारंभ आज ह भ प गुरुवर्य तुळशीराम महाराज सरकटे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

यावेळी सरकटे महाराजांनी सांगितले इवलेसे रोप लाविले द्वारे त्याचा वेलू गेला गगनावरी, याप्रमाणे छोटसं लावलेलं रोपट आज त्याचा वटवृक्षामध्ये रूपांतर होताना पाहताना महाराजांना अतिशय आनंद झाला कारण महाराज बोलताना म्हणाले संस्थेने अतिशय कमी वेळामध्ये मोठी प्रगती केली असून सात साहेबांच्या गोड वाणीमुळे सर्वसामान्य जनता जोडली गेलेली असून संस्थेने प्रचंड असा विश्वास संपादन केला आहे अशीच संस्थेची भरभराट व्हावी असंही ते म्हणाले.

चेअरमन सुभाष राव साठे यांनी आपल्या मनोगत मध्ये बोलताना सांगितले की मी आदरणीय बाबा शेठ कवाद यांच्या संस्थेमध्ये २० वर्षे काम केले होते, सहकार क्षेत्राचा असलेला अनुभव व सर्वसामान्य मायबाप जनतेचे प्रेम व थोरा मोठ्यांच्या आशीर्वादामुळे मी आज इथपर्यंत पोहोचू शकलो. चेअरमन साहेब म्हणाले निघोज शाखेच्या स्थलांतर कार्यक्रमाचे निमित्य साधून संस्थेने सर्व सामान्य जनतेसाठी १ वर्ष ठेवी साठी भरीव १०३ व्याजदर देण्याचे ठरवले असून ही योजना पुढील एक महिना चालू राहील, सर्वसामान्य जनतेने त्या योजनेचा लाभ घ्यावा. माझ्या हातून अशीच यापुढे सेवा घडत राहील अशी मी आपणाला ग्वाही देतो. आज अखेर संस्थेच्या पाच शाखा अतिशय उत्कृष्ट पद्धतीने कार्यरत आहे असेही त्यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रम च्या निमित्ताने, व्हा.चेअरमन अजित मदगे, संचालक परिवार सर्व शाखाचे सल्लागार मंडळ त्याचप्रमाणे ह.भ.प बबन महाराज थोरात, निवृत्ती महाराज तनपुरे, भीमा शेठ घुले, चंदू शेठ दवण, संतोष शेठ बरखडे, संपत शेठ बाढवणे, सुरेश लाळगे, जगदाळे जवाहर, गौतम डवळे, रामदास गाडिलकर, सुधीर दवळे, हिंगे शेठ, पांडुरंग रसाळ, साहेबराव रसाळ, मेसे पाटील, कारभारी रासकर, बाळू शिंदे, राजेंद्र चेडे, संजय पठारे, पिंपरकर शिवाजी, भगवान पिंपरकर, अर्जुन रसकर, प्रभाकर पठारे, सालके पाटील, आणा पाटील बडे, दत्ता लंके, पोपट कळसकर, ~~~ बाळासाहेब लामखडे, सुनील साठे, आनंदा कवाद, मारुती कळसकर, विष्णू गाडीलकर, बबन तनपुरे, सतीश छाजेड,

यावेळी युवा नेते रुपेश दादा दवण, संजय बडे सर सरपंच प्रवीण उदमले, प्राध्यापक डांगे सर यांनी मनोगत व्यक्त केले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कळसकर व शरद दुबे यांनी केले निघोज व्यवस्थापक बबन बेलोटे, प्रशासन प्रमुख रोहन साठे कर्ज विभाग प्रमुख खोडाळ प्रशांत यांनी केले व त्यांना साथ संपूर्ण कर्मचारी वर्गाने दिली व आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला.

पीस पोस्टर स्पर्धा व नाट्य प्रशिक्षण कार्यशाळेतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाली नवी दिशा

खिंवसरा पाटील शिक्षण संकुलात 'दप्तराविना आनंददायी शनिवार' उत्साहात



पुणे प्रतिनिधी / शकील मनियार

लायन्स क्लब ऑफ पुणे फिनिक्स यांच्या वतीने क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती संचालित खिंवसरा पाटील शिक्षण संकुलात शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी पीस पोस्टर स्पर्धा आणि नाट्य प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विविध कलाकौशल्यांनी रंगलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना दप्तराविना आनंददायी शनिवार अनुभवता आला.

या कार्यक्रमास लायन्स क्लब ऑफ पुणे फिनिक्सच्या अध्यक्षा एलएन अनुजा करवडे, सचिव एलएन प्रैशली दिवाण, कोषाध्यक्ष एलएन धनश्री केळकर, तसेच एलएन अभिजीत करवडे, एलएन नरेंद्र प्रभू, एलएन रजनी देशपांडे, एलएन जया सिंगवी, एलएन किरण वैद्य, एलएन सुनीता जाधव, एलएन शुभांगी कारंडे, एलएन योगिनी मिसाळ, एलएन श्रीधर टोकणीकर यांच्यासह क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे संचालक सदस्य आसाराम कसबे व सिद्धेश्वर इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

पीस पोस्टर स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या सजनशीलतेला वाव

पीस पोस्टर स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, कलात्मक अभिव्यक्ती तसेच शांततेविषयी सकारात्मक विचार विकसित करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. या स्पर्धेत संकुलातील इयत्ता सहावी ते नववीच्या ४५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

नाट्यप्रशिक्षणातून अभिनयाचे प्रत्यक्ष धडे

नाट्य प्रशिक्षण कार्यशाळेत प्रसिद्ध नाट्य अभिनेते किरण वैद्य यांनी विद्यार्थ्यांना नाटक म्हणजे काय, नाटकाचे विविध प्रकार, अभिनयाची मूलतत्त्वे तसेच अभिनयासाठी आवश्यक असलेले सुदृढ शरीर, योग्य स्वराघात, रंगमंचावरील आत्मविश्वास, भूमिकेचा अभ्यास, सहज वावर, प्रकाशयोजना, वेशभूषा, नेपथ्य, प्रभावी संवादफेक, मूकाभिनय आणि नवरसांची ओळख याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग घेऊन विविध अभिनयकौशल्यांचा प्रत्यक्ष सराव करून घेण्यात आला. यशस्वी अभिनेता होण्यासाठी सूक्ष्म निरीक्षणशक्ती अत्यंत आवश्यक आहे, असा कानमंत्र किरण वैद्य यांनी सहभागी ८५ विद्यार्थ्यांना दिला.

पीस पोस्टर स्पर्धा तसेच नाट्य प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या संपूर्ण उपक्रमाचे संयोजन संकुलाच्या पालक प्रमुख सुनीता घोडे, मुख्याध्यापिका मंजुषा गोडसे, बालविभाग प्रमुख सौ. स्मिता जोशी, शिक्षिका पल्लवी सिनकर, तसेच शिक्षक योगेश्वरी महाजन, शुभांगी धिवार, अश्विनी बाबीस्कर, श्याम मस्तुद आणि सर्व शिक्षकांनी केले. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

'अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी गौरव पुष्पमाला' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

सातारा : संविधान लोकजागर परिषदेच्यावतीने अध्यक्ष भगवान अवघडे लिखित, 'अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी गौरव पुष्पमाला' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिका आशालताताई कांबळे यांच्या हस्ते केळकर कॉलेज मुलुंड येथे करण्यात आले.

सामूहिक संविधान उद्देशिका वाचनाने सुरुवात करण्यात आली. आयोजक मुंबई शाखेच्या संविधान लोकजागर परिषदेच्या अध्यक्षा वृषाली माने यांनी प्रस्तावना केली.

भगवान अवघडे म्हणाले, 'अण्णाभाऊ साठे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे वाहक आहेत. तसेच ते लोकांना जोडणारे एक ब्रीज आहेत. सन २००८ मध्ये गोविंदराव पानसरे यांचा खून धर्मांध शक्तीने घडवून आणला.' भगवान अवघडे यांनी अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. तेव्हा पासूनचा या पुस्तकाचे लेखन केले असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अविनाश भगवान अवघडे यांनी पीएचडी प्राप्त केल्याने त्यांचा सन्मानपत्र, शाल, गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. सन्मानपत्राचे वाचन डॉ. वैशाली धम्मपथी यांनी केले. सत्कारास उत्तर देताना डॉ. अवघडे म्हणाले, 'मी केलेली पीएचडी ही आई- वडिलांच्या प्रेरणेने बाबासाहेब आंबेडकरांच्या चरणी अर्पण करतो.' आनंद ओव्हाळ म्हणाले, '२००३ पासून शिक्षणाचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे. या दृष्टीने काम करतोय. आपण सर्वांनी सरकारने निर्माण केलेल्या विषयाभोवती फिरतो आहोत. ते बंद करून आपल्या प्रश्नाच्या उत्तरासाठी सरकारला फिरवलं पाहिजे. अर्थात, बेटींस धरले पाहिजे.'

साहित्यिका छायाताई कोरेगावकर यांनी पुस्तकाचे अभ्यासपूर्ण सखोल आकलन करून त्यावर मत व्यक्त करताना म्हणाल्या, 'स्वतः अण्णाभाऊ साठे आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेतील समाजामध्ये होणाऱ्या दुरीला मिटवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.' सामाजिक कार्यकर्ते ?डॉ.बंडू घोडे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा सार हा संवैधानिक मुल्य जोपासणारे मानव मुक्ती केंद्रित आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या बंडखोर स्त्रियांची व्यक्तिरेखा जिवंत केली असल्याचे त्यांनी सांगितले. संध्या जंगले म्हणाल्या, 'संविधान कार्यशाळेची मी विद्यार्थिनी आहे.त्यामुळे

आपले अधिकार काय ? कर्तव्य काय? हे समजण्यास साह्य झाले. तेव्हा संवैधानिक मुल्य जोपासले पाहिजे.तेव्हा एका माणसाला तरी संविधान कार्यशाळेत सहभागी व्हायला प्रवृत्त केले पाहीजे.' रंजना हिरे यांनी सामूहिक राष्ट्रगीत घेऊन कार्यक्रमाची सांगता केली.सूत्रसंचालन पोर्णिमा गणवीर यांनी केले.मंदाताई कचरे यांनी आभारप्रदर्शन केले.

याकामी, विशेष सहाय्य डॉ. वैशाली धम्मवती, संदीप माने, उमेश कांबळे, शुद्धोधन अहिरे आदींनी अथक असे परिश्रम घेतले. यावेळी कुंदाताई निळे, पंचरत्न देठे, शारदा नवले, विजय त्रिभुवन, गौतम सांगळे, स्वप्नील ताबे, सुहास डांगळे, विश्वनाथ शिरसाठ, दामोदर पगारे, पुंडलिक

विलायती बाभळीच्या निर्मूलनासाठी आमदार राजेश बकाने यांचा पुढाकार

शेतकऱ्यांच्या चाऱ्याचा प्रश्न, रस्ते वाहतुकीतील अडथळे दूर करण्यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे निवेदन



आरती कारंजेकर

देवळी (प्रतिनिधी) : देवळी विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात वनविभागाच्या विविध जागांवर मोठ्या प्रमाणात वाढलेल्या विलायती बाभळीच्या समस्येकडे आमदार राजेश बकाने यांनी गांभीर्याने लक्ष वेधले आहे. शेतकरी व पशुपालकांना भेडसावणाऱ्या चाऱ्याच्या प्रश्नासोबतच ग्रामीण रस्त्यांच्या दुतर्फा वाढलेल्या या झाडांमुळे होणारे वाहतुकीचे अडथळे लक्षात घेता, विलायती बाभळीचे टप्प्याटप्प्याने निर्मूलन करून त्या ठिकाणी देशी वृक्षप्रजातीचे वनीकरण करण्याची मागणी त्यांनी महाराष्ट्राचे वनमंत्री मा. ना. श्री. गणेशजी नाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

देवळी विधानसभा मतदारसंघातील अनेक ग्रामीण भागात विलायती बाभूळ (Prosopis juliflora) मोठ्या प्रमाणात पसरली आहे. ही परदेशी व आक्रमक वृक्षप्रजाती असल्याने तिच्या अनियंत्रित वाढीमुळे स्थानिक गवत, वनस्पती आणि जैवविविधतेवर परिणाम होत आहे. विशेषतः गावालगत तसेच वनविभागाच्या जागांवर या झाडांचा वाढता विस्तार झाल्याने गुरांसाठी उपलब्ध असलेले नैसर्गिक चाऱ्याचे क्षेत्र कमी होत असल्याची समस्या शेतकरी आणि पशुपालकांकडून सातत्याने मांडली जात आहे.

'शेतकऱ्याच्या जनावरांसाठी चारा ही केवळ पर्यावरणाची बाब नसून त्याच्या कुटुंबाच्या अर्थकारणाशी जोडलेली गरज आहे,' या भूमिकेतून आमदार बकाने यांनी हा प्रश्न मांडला आहे. विलायती बाभळीमुळे स्थानिक गवत आणि चाऱ्याची उपलब्धता कमी होत असल्याने पशुपालकांना वाहेकन चारा आणण्याचा अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागतो, त्यामुळे या समस्येकडे केवळ वनसंवर्धनाच्या दृष्टिकोनातून न पाहता शेतकरी आणि पशुपालकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न म्हणून पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी निवेदनातून स्पष्ट केले.

देशी वृक्षांचे वनीकरण करण्याची मागणी

विलायती बाभळीचे निर्मूलन केल्यानंतर त्या जागा पुन्हा अशाच प्रकारच्या आक्रमक वनस्पतींच्या ताब्यात जाऊ नयेत, यासाठी स्थानिक हवामान, माती आणि पर्यावरणाला अनुरूप मूळ भारतीय देशी वृक्षप्रजातींची लागवड करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

रस्ते वाहतुकीलगी अडथळा

ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कडेला आणि काही ठिकाणी रस्त्याच्या हद्दीगत वाढलेल्या विलायती बाभळीमुळे वाहनचालकांना अडचणी निर्माण होत आहेत. झाडांच्या फांद्या रस्त्यावर येत असल्याने वाहनांच्या सुरक्षित वाहतुकीवर परिणाम होतो. विशेषतः रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज घेण्यात अडथळा निर्माण होऊन अपघाताचा धोका वाढतो. शेतीमालाची वाहतूक, शालेय विद्यार्थ्यांची ये-जा तसेच गावांतर्गत्यानची नियमित वाहतूक यावरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

त्यामुळे शेतकऱ्यांना चारा, पर्यावरणाचे संरक्षण आणि ग्रामीण रस्त्यांची सुरक्षित वाहतूक या तिन्ही बाबींचा समन्वय साधत वनविभागाच्या जागांवरील विलायती बाभळीचे नियोजनबद्ध पद्धतीने निर्मूलन करण्याची मागणी आमदार बकाने यांनी केली आहे.

यामुळे स्थानिक जैवविविधतेचे संवर्धन होण्यासोबतच भविष्यात ग्रामीण भागातील पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होईल. तसेच स्थानिक गवत व चाऱ्याच्या बाबींस पोषक वातावरण निर्माण होऊन शेतकरी व पशुपालकांना त्याचा फायदा होऊ शकतो.

वनविभागाला विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश द्यावेत

या समस्येवर केवळ तात्पुरती उपाययोजना न करता वनविभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश देऊन विलायती बाभळीच्या निर्मूलनासाठी टप्प्याटप्प्याने विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी आमदार राजेश बकाने यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली आहे. शेतकऱ्यांच्या रोजच्या अडचणी, पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता आणि ग्रामीण भागातील सुरक्षित वाहतूक यासारखे प्रश्न प्रत्यक्ष गावपातळीवर समजून घेऊन त्यासाठी शाश्वतकडे वातल्याने पाठपुरावा करण्याची भूमिका आमदार बकाने यांनी घेतली आहे. त्यामुळे शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नांसाठी उभा राहणारा आमदार अशी त्यांची भूमिका या निवेदनातून पुन्हा अधोरेखित झाली आहे.

करंभाड नगरीत गणपती बाप्पाचे उत्साहात आगमन



करंभाड दिलीप येवले :

करंभाड नगरीत गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणपती बाप्पाचे उत्साहात आगमन झाले. नाखडे निवास व धनराजजी काडे यांच्या निवास येथे शिवशाही युग्पचा वतीने गणरायाचे भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांचा गजर, जयघोष आणि उत्साहाच्या वातावरणात बाप्पाची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी शिवशाही युग्पच्या सदस्यांनी एकत्र येत गणरायाला भेट अर्पण करून भक्तिभावाने दर्शन घेतले. परिसरात 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले होते. याप्रसंगी गज्जु काळे, सोनू भक्ते, मंगेश ठाकरे, गौरव उनपाने, गोलू काडे, विक्की पायतोडे, लोकेश भगत, रवी शिवणकर, गणी काळे, यशवंत भक्ते, रोहन माटे, राहुल ठाकरे, पवन नाखले यांच्यासह शिवशाही युग्पचे सदस्य उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सांस्कृतिक परंपरा जपण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. गणरायाच्या आगमनाने करंभाड परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गवंडी येथे तान्हापोळ्यात बालकांना भेटू वस्तूचं वाटप

युवा नेते भूपेश बारंगे यांच्यासह मित्रमंडळाकडून ३०० बालगोपाला भेटवस्तु वाटप

कन्नमवार ग्राम जिल्हा परिषद सर्कलचे तडफदार युवा नेतृत्व



कारंजा : विदर्भात बैलपोळा महत्व असताना तान्हापोळा गावागावात साजरा केला जातो. यावेळी गावातील लहान मुले लाकडी नंदी बैल सजावट करून तान्हा पोळा मध्ये आणतो. मोठ्या उत्सहात पार पाडला जातो. गवंडी येथील महादेवराव खवशी यांच्या घरून तान्हा पोळाची सुरुवात केली जाते. ढोल ताशाच्या गजारात नंदीबैल मिरवणूक काढून गावातील श्रीमंत किल्ले सरकार टेकडी च्या समोर तान्हा पोळा भरला जातो गावातील सर्व लहान मुले मुली या तान्हा पोळ्यात सहभागी होऊन एका ठिकाणी जमा होऊन तान्हा पोळा भरतो. दरवर्षी भरणाऱ्या तान्हा पोळ्यात लहानग्या उत्साह वाढवण्यासाठी त्यांना भेट वस्तू देण्यात आले. कन्नमवार ग्राम जिल्हा परिषद सर्कल मधील मोठ्या संख्येने असलेले गवंडी गावात तान्हा पोळा निमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक युवा नेते भूपेश बारंगे यांच्या नेतृत्वात मित्रमंडळी कडून बालगोपालाचा उत्साह वाढवण्यासाठी भेट वस्तू वाटप केले. ग्रामीण भागातील युवकांना प्राधान्य मिळवण्यासाठी भूपेश बारंगे नेहमी प्रयत्न करत असतात यातच त्यांनी आपल्या मित्र मंडळींना सोबतच घेऊन गावातील तान्हा पोळा सहभाग घेऊन लहान्यांचा उत्साह वाढवला. बालगोपाला भेट वस्तू मिळताचा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित केला . गावातील तान्हा पोळ्यात सहभागी झालेले जवळपास ३०० मुलांना भेट वास्तूचे वाटप केले. यावेळी भूपेश बारंगे, नेत्राम चौधरी, हेमंत किनकर, मनोज मानमोडे, घनश्याम बमनोटे, उज्वल किनकर, रोशन राऊत, प्रकाश कडवे, संतोष घोटे, कैलास घोटे, नागोराव टवरे, आकाश चौधरी, रुपेश किनकर, गौरव पांडुरकर, नितीन चौधरी, मनोज डोंगरे, राहुल रमधम, योगेश चोपडे, गोविंदा किनकर, बळीराम खवशी, उत्तम काळबांडे, किसना चौधरी, गुणवंत गोहते, सूरज मानमोडे, जीवन घारगे, सचिन घोटे, प्रकाश चौधरी, अनिल चौधरी, जगदीश चौधरी, दिगंबर चौधरी यांच्या सह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

बॅरि. वानखेडे महाविद्यालयात इंजिनियर्स डे संपन्न



मोहपा दिलीप येवले:-

स्थानिक मोहपा येथे १५/०९/२०२६ ला भारताचे महान अभियंता सर मोक्षगुंडा विश्वरय्या यांचा जन्मदिवस म्हणजे इंजिनिअर्स डे म्हणून साजरा केला जातो. मोहपा, येथील मुख्य अभियंता अनिल जाने यांनी इंजिनियर चे महत्व सामाजिक जीवनात कशा प्रकारचे आहे हे सांगून सोलर हे आज घरोघरी लावले पाहिजे आणि स्वतःचा वेळ आणि पैशाची बचत करावी. असे प्रमुख वक्ता म्हणून जाने बोलत होते. सुरज भुरे यांनी विद्युतचा कशाप्रकारे वापर करावा. यावर प्रकाश टाकला. नितीन राजपूत यांनी उपस्थितांना वीज सुरक्षितेच्या संदर्भात शपथ दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अलका थोडगे यांनी आजचा प्रत्येक विद्यार्थी हा अभियंताच आहे.असे अध्यक्षीय भाषणातुन बोलले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. विनोद भालेराव यांनी केले. कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असलेले प्रा. डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजित जाचक डॉ.धनंजय देवते, प्रा.डॉ. लीलाधर खरपूरिये, प्रा. डॉ.अनिता गणोरकर, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्रा.पवन उमप, प्रा. शुभम डबरासे, श्रीमती कल्पना देवळे, प्रदीप बगडे, अरविंद डहाट कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन काळे तर आभार प्रा. शैलेश हातवुडे व विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

आरोग्य कर्मचाऱ्यांचे जिल्हा परिषदेसमोर धरणे.!



वर्धा (प्रतिनिधी) : आरोग्य कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आरोग्य कर्मचारी संघटना कृती समितीच्या वतीने मंगळवारी (१५ सप्टेंबर) जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. नियमित, कंत्राटी आरोग्य कर्मचारी व अंशकालीन स्त्री परिचर मोठ्या संख्येने सहभागी झाले. आरोग्य कर्मचाऱ्यांना दर महिन्याच्या ५ तारखेपूर्वी वेतन द्यावे, रिक्त पदे तातडीने भरावीत, पात्र कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या व १०, २०, ३० वर्षांची कालबद्ध पदोन्नती मंजूर करावी, ऑनलाइन कामाशाही स्वतंत्र मनुष्यबळ द्यावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्ती व

प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्याची मागणी; प्रशासनाला आंदोलनाचा इशारा

रोखीकरणाची बिले, सेवानिवृत्ती लाभ आणि अंशकालीन स्त्री परिचारांचे थकीत मानधन तातडीने अदा करावे. आरोग्यवर्धिनी केंद्रांचे दोन वर्षांपासून प्रलंबित इन्सेन्टिव्ह देण्याची मागणीही करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांना निवेदन दिले. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आपल्या स्तरावरील मागण्या तातडीने निकाली काढण्याच्या सूचना दिल्या. यावेळी अमोल भोसले व डॉ. स्वप्नील बेले उपस्थित होते. मागण्या मार्गी न लागल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनांनी दिला.

तायवाडे महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकचे उद्घोधन सत्राचे आयोजन'



कोराडी दिलीप येवले: -

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत, अभ्यास केंद्र - तायवाडे महाविद्यालय, महादुला-कोराडी येथे शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ च्या प्रथम उद्घोधन सत्र (Induction Session), यश कार्ड (Activation) तसेच क्रीडा महोत्सव व युवक महोत्सव याबाबत महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम मा. पंजाबराव देशमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले व त्यानंतर पाहुण्यांचा परिचय व स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील य.च.म.मु.वि.नाशिक अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ.वकील शेख तर प्रमुख वक्ते म्हणून तायवाडे महाविद्यालयाचे इंग्रजी विभागाचे प्राध्यापक डॉ. विष्णू चव्हाण तर प्रमुख अतिथी म्हणून तायवाडे महाविद्यालयातील हिन्दी विभागाचे प्राध्यापक डॉ. राहुल वाघमारे आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनिल घुगल तसेच अभ्यासकेंद्राचे केंद्र सहाय्यक पचाकर इंगोले मंचावर उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक डॉ. विष्णू चव्हाण यांनी आपल्या भाषणात परीक्षे मध्ये यश मिळविण्यासाठी स्वयं अध्ययन, स्वयं शिस्त, आणि योग्य नियोजनाची गरज असल्याचे नमूद केले. तसेच काळानुरूप कठीण परिश्रम न करता हुशारीने कार्य करण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना त्यांनी गृहपाठ आणि प्रकल्प तयार करतांना आपल्या शिक्षकांची मदत घेवून आजचीगरज व त्याची उपयोगिता लक्षात घेवून तयार करावा. तसेच डॉ.राहुल वाघमारे, डॉ.वकील शेख या सर्वांनी येणा-या नविन विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम व इतर सर्व कार्यक्रमाची माहिती व त्यामागील महत्व समजावून सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु.कामिनी माडेकर यांनी तर आभारप्रदर्शन पचाकर इंगोले यांनी मानले. या कार्यक्रमाला तायवाडे कॉलेजचे, प्रा.विवेक महाजन, प्रा.प्रशांत माहुरे,कु.स्नेहा श्रीवास्तव, पल्लवी देवगिरीकर, चेतना हरने तसेच बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

हरतालिका पूजन .. नदीवर विधिवत केले विसर्जन



मौदा : यंदा गणेश चतुर्थीच्या दिवशीच हरतालिका पूजन केले गेले. याच दिवशी माता गौरा पार्वती आणि भगवान शिव यांची विधिवत पूजा केली जाते. सोमवारी विविध गावातील गावजवळी नदीवर हरतालिकेचे पूजन करण्यात आले. मंगळवारी गौरीचे विसर्जन करण्यात आले. **(छाया - दिलीप येवले)**



वार्ड नंबर ४, खापरखेडा येथील भूपेन्द्र चतुर्वेदी यांचा कडे गणपती बाप्पा चे आगमन झाले. विधिवत पूजा, अर्चना करून आरती केली जाते. मागील १० वर्षी पासून चतुर्वेदी यांची कडे गणपती बाप्पा विराजमान होते.

(छाया: - दिलीप येवले)

एसकेबी कॉलेजमध्ये 'इंटरनल हॅकाथॉन २०२६' चे आयोजन: एसआयएचच्या राष्ट्रीय आव्हानांवर तोडगा काढण्यासाठी २८ विद्यार्थी संघांमध्ये रंगली चुरस



नागपूर/दिलीप येवले

संशोधन, तांत्रिक कल्पकता आणि उद्योजकतेच्या संस्कृतीला चालना देण्याच्या उद्देशाने, श्रीमती किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसीच्या 'इन्स्टिट्यूट इनोव्हेशन कौन्सिल' (छ्य) आणि 'इन्क्युबेशन सेंटर'तर्फे ८ सप्टेंबर २०२६ रोजी 'एसकेबी इंटरनल हॅकाथॉन २०२६' चे आयोजन करण्यात आले होते. नामांकित 'स्मार्ट इंडिया हॅकाथॉन' (एच) २०२६ च्या अंतर्गत निवड प्रक्रियेचा (स्क्रूटिनी) भाग म्हणून आयोजित केलेल्या या चुरशीच्या स्पर्धेत संस्थेतील २८ संघांनी सहभाग घेतला. विविध उद्योग, शासकीय कार्यालये आणि राष्ट्रीय प्रयोगशाळांनी एसआयएच पोर्टलवर नोंदवलेल्या वास्तविक समस्यांवर व्यवहार्य उपाय शोधण्यासाठी विद्यार्थ्यांनी यात ताकदीने सादरीकरण केले.

या मूल्यमापन समितीचे अध्यक्ष डॉ. मिलिंद जे. उमेकर होते, ज्यांनी या स्पर्धेत मुख्य परीक्षक म्हणूनही भूमिका बजावली. परीक्षक मंडळात डॉ.नेहा राऊत, डॉ. अमोल तातोडे, श्री. कुतुब मोहम्मद, डॉ. उमा कावरा आणि डॉ. शुभदा मंगरूळकर यांचा समावेश होता. त्यांनी प्रत्येक संघाच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांचे काटेकोर परीक्षण केले. सादरीकरणादरम्यान परीक्षकांनी तांत्रिक आणि नियामक (रेग्युलेटरी) बाबींवर मोलाचे मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांची उपयुक्तता, व्यापकता (स्केलेबिलिटी) आणि व्यावसायिक क्षमता अधिक बळकट करण्यास हातभार लावला.

सविस्तर सादरीकरण आणि मूल्यमापनानंतर अनेक हार्डवेअर व सॉफ्टवेअर प्रकल्पांनी उल्लेखनीय कार्यक्षमता सिद्ध करत एसआयएच २०२६ च्या पुढील राष्ट्रीय फेऱ्यांसाठी संस्थेकडून नामांकन मिळवले. या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन प्राध्यापक डॉ. मनीष अगलावे, डॉ. संदीप रहांगडाले आणि डॉ. मयूर काळे यांनी केले. तर तांत्रिक बाजू आणि सोशल मीडिया व्यवस्थापनाची धुरा सहाय्यक प्रा. सुश्री रुची खोब्रागडे यांच्यासह अथर्व डांगोरे, ज्ञानेश्वरी पवार, ऋषभ सोनी, रजत कायरकर, ज्ञानेश्वरी डागा, मोहम्मद कैफ, ओम खेलोले आणि आदर्श तरवाले या विद्यार्थी चमूने सांभाळली. डॉ. उमेकर यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या निवडक संघांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

रामकृष्ण वाघ महाविद्यालयामध्ये हिंदी दिवस उत्साहात साजरा



कोराडी दिलीप येवले: -

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य प्रा .पंकज इगडे, संस्थेचे सदस्य हिंदी विभागाचे सहाय्यक प्रा. नकुल वाघ, मुख्य अतिथी डॉ. राजेश पशीने (प्रा. धरमपेठ कॉलेज, नागपूर) सर्व शाखा विभाग प्रमुख प्रा. दीपक ठाकरे, सांस्कृतिक व वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. किरण पांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले. हिंदी भाषा ही केवळ संवादाची भाषा नसून ज्ञान, साहित्य, संस्कृती आणि रोजगाराच्या दृष्टीने ही महत्त्वाची भाषा आहे आजच्या बदलत्या काळात हिंदी भाषेवर चांगले प्रभुत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत अध्यापन, पत्रकारिता, अनुवाद लेखन, जाहिरात, प्रसार माध्यमे, दूरदर्शन, रेडिओ, डिजिटल मीडिया, निवेदन, सूत्रसंचालन तसेच पर्यटन क्षेत्रात हिंदी भाषेचे ज्ञान उपयोगी ठरते मात्र त्यासाठी मेहनत, सातत्य, आत्मविश्वास आणि योग्य कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे' असे प्रतिपादन मुख्य अतिथी प्राचार्य डॉ. राजेश पशीने यांनी केले . संस्थेचे सदस्य व हिंदी विभाग सहाय्यक प्रा. नकुल वाघ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,' हिंदी भाषेचे वाचन व लेखन वाढवून तिच्या संवर्धनासाठी प्रयत्न करावेत हिंदी भाषेचा सन्मान करणे म्हणजे आपल्या समृद्ध भारतीय संस्कृतीचा सन्मान करणे होय'. सर्व शाखा विभाग प्रमुख प्रा.दीपक ठाकरे यांनी 'हिंदी ही भारतातील विविध भाषिक व सांस्कृतिक समूहांना जोडणारी महत्त्वाची भाषा आहे. विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचा अभ्यास करून तिच्या समृद्ध साहित्याची ओळख करून घ्यावी ',असे अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले. हिंदी दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजनात्मक व ज्ञानवर्धक खेळांचे आयोजन करण्यात आले हिंदी शब्द ओळखा, शब्द साखळी आदी खेळामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला या खेळामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यावरोबरच कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विविध खेळांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक आल्याबद्दल विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक सचिव प्राचार्य डॉ. मारोती वाघ, संस्थेच्या संचालिका प्राचार्या डॉ. लता वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पायल पशीने यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कोमल कनोजिया यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. शुभांगी वाघ यांनी केले.

कार्यक्रम सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

भारतीय ज्ञानपरंपरेच्या जतन व संवर्धनासाठी एशियाटिक सोसायटीने पुढाकार घ्यावा : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईने ज्ञानाचे डिजिटायझेशन करून देशभरातील ग्रंथालये व संशोधन संस्थांशी जोडावे

मुंबई : भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्यासाठी एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईने पुढाकार घ्यावा. संस्थेकडील ज्ञानसंग्रहाचे डिजिटायझेशन करून हा ज्ञानसंग्रह देशभरातील विद्यार्थी, संशोधक आणि अभ्यासकांना उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

टाउन हॉल येथे एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईच्या नवनिर्वाचित समितीच्या परिचय कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा अध्यक्ष ?ड. राहुल नार्वेकर, आमदार अमित साटम, प्रवीण दरेकर, एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे, सचिव विवेक गणपुले आदी उपस्थित होते. यावेळी सुप्रसिद्ध उद्योजक रमेश दंडवते यांनी एशियाटिक सोसायटीच्या बळकटीकरणासाठी ५० लाख रुपयांची मदत केली. त्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, राष्ट्राची स्मृती, इतिहास, संस्कार, भाषा, अभिलेख आणि परंपरांचे जतन करणे महत्त्वाचे आहे. इतिहास आणि सांस्कृतिक परंपरांचे संरक्षण करणाऱ्या राष्ट्राची अस्मिता कधीही नष्ट होत नाही. भारतीय ज्ञानपरंपरा अनेक आव्हानांनंतरही टिकून राहिली आहे. ज्ञान कोणत्याही चौकटीत बंदिस्त न राहता मुक्त असले पाहिजे. या ज्ञानाचा



उपयोग देशासह संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी व्हावा.

भारतीय इतिहास, पुरातत्त्व, भाषा, तत्त्वज्ञान, साहित्य आणि विज्ञानाचे पुनर्मूल्यांकन भारतीय दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. सोसायटीने महाराष्ट्रातील विद्यार्थी व संशोधकांना संग्रहाच्या अभ्यासासाठी प्रोत्साहन द्यावे, ज्ञानसंग्रहाचे डिजिटायझेशन करावे आणि देशातील ग्रंथालये व संशोधन संस्थांना सामायिक व्यासपीठावर जोडावे. तसेच 'ज्ञान भारत राष्ट्रीय पांडुलिपी मिशन'मध्ये सक्रिय सहभाग घेऊन गावागावांत आणि विद्वानांच्या घरांमध्ये जतन केलेल्या दुर्मीळ पांडुलिपींचा शोध, संकलन, संवर्धन व संशोधनासाठी विशेष अभियान राबवावे, असे आवाहनही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

एशियाटिक सोसायटीचे कार्य अधिक व्यापक व्हावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एशियाटिक सोसायटीच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी राज्य शासनाचे पूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली. इतिहास हा केवळ भूतकाळ समजून घेण्याचे साधन नसून वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्याचा वेग निश्चित करणारा महत्त्वपूर्ण दुवा आहे, असे त्यांनी सांगितले. मानवतेचा प्रवास, विचारांची जडणघडण, अभ्यासपद्धती आणि विविध शास्त्रांची उत्क्रांती यांचे दस्तऐवजीकरण होणे अत्यावश्यक आहे.

परकीय आक्रमणांमध्ये नालंदा विद्यापीठाची मोठ्या प्रमाणावर नष्ट झालेली ग्रंथसंपदा आणि त्यासंदर्भातील घटनांतून ज्ञानसंपदेच्या जतनाचे महत्त्व अधोरेखित होते. मात्र, अनेक विद्वानांनी उपलब्ध ग्रंथांचे संरक्षण करून ही समृद्ध ज्ञानपरंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली. या परंपरेचे जतन आणि संवर्धन करणे ही आजची मोठी जबाबदारी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

नव्या कार्यकारिणीच्या प्रयत्नांमुळे संस्थेला नवसंजीवनी मिळाली असून एशियाटिक सोसायटी नव्या उमेदीने कार्यरत होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची नवीन जागा तयार झाली आहे. ते या नवीन जागेत हलविण्याबाबत निर्णय झालेला आहे. तसेच, ग्रंथालय संचालनालय व सहायक मुद्रांक नियंत्रकांची कार्यालयेही येथून अन्यत्र हलविण्याबाबतही लवकरच शासनाकडून आवश्यक सहकार्य करण्यात येईल. सोसायटीच्या मुख्य कार्याला अधिक बळ मिळावे, तसेच येथे येणाऱ्या अभ्यासकांना आवश्यक ग्रंथ, संदर्भसाहित्य आणि ज्ञानसंपदा सहज उपलब्ध व्हावी, यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल. मुख्यमंत्री कार्यालय, संबंधित अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून आवश्यक मदत केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी एशियाटिक सोसायटीच्या नूतन कार्यकारिणीला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत संस्थेच्या भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

एशियाटिक सोसायटीचा वारसा जतन करण्यासाठी शासनाचे सर्वतोपरी सहकार्य – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, एशियाटिक सोसायटीचा २२२ वर्षांचा गौरवशाली वारसा आहे. प्राचीन ग्रंथ, पांडुलिपी व नाणी यांचे जतन भावी पिढ्यांसाठी आवश्यक असून या वारशाच्या संवर्धनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारकडून संस्थेला सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला आयोजित या कार्यक्रमाबद्दल त्यांनी आयोजकांचे अभिनंदनही केले.

'गणेश ज्ञानारती' प्रदर्शनाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई येथे 'गणेश ज्ञानारती' प्रदर्शनाचे उद्घाटन केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी प्रदर्शनाची पाहणी करून ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेव्यांची माहिती जाणून घेतली.

प्रदर्शनात मौर्य, सातवाहन, गुप्त आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सुमारे १,३०० दुर्मीळ सुवर्ण, रजत, कांस्य व तांब्याचा ऐतिहासिक नाणी प्रदर्शित करण्यात आली आहेत. भगवान गौतम बुद्धांच्या भिक्षापात्राचा अंश, बुद्ध प्रतिमा व बोधिसत्त्वाचे अवशेषही मांडण्यात आले आहेत. मुघलकालीन हिंदुस्तानाचा १७८८ मधील नकाशा आणि नर्मदा नदीचा १८७० मधील नकाशाही प्रदर्शनाचे आकर्षण आहे.

भारतीय राजे व जमीनदारांचा शाही दरबार अल्बमसह अनेक दुर्मीळ ऐतिहासिक ग्रंथही येथे प्रदर्शित करण्यात आले होते. कोल्हापूर व कान्हेरी येथील पुरातत्त्वीय उत्खननातील वस्तू तसेच बुद्ध प्रतिमा यांच्यासह भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्वीय वारशाचे समृद्ध दर्शन घडविणारे हे प्रदर्शन होते.

राजनी फाट्याजवळ अपघातात हातमजुराचा मृत्यू

४६ वर्षीय प्रवीण मुसळे यांचा दुर्दैवी अंत; अपघाताचे कारण अद्याप अस्पष्ट



आष्टी : कारंजा तालुक्यातील राजनी फाट्याजवळ काल रात्री ७ ते ७.३० वाजताच्या सुमारास झालेल्या अपघातात प्रवीण बाबारावजी मुसळे (वय ४६, रा. आनंदवाडी, ता. आष्टी, जि. वर्धा) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मुसळे हे हातमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास मुसळे हे दुचाकीने प्रवास करत असताना राजनी फाट्याजवळ अपघात झाला. मात्र, अपघात नेमका कसा घडला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. अपघातानंतर मुसळे काही काळ रस्त्याच्या परिसरात पडलेल्या अवस्थेत होते. जवळपास अर्धा ते एक तासाने या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या निदर्शनास ते आले.

नागरिकांनी तत्काळ ?म्बुलन्सला तसेच मुसळे यांच्या मुलाला फोन करून घटनेची माहिती दिली. ?म्बुलन्स घटनास्थळी पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी तपासणी करून प्रवीण मुसळे यांना मृत घोषित केले.

दरम्यान, घटनास्थळी कारंजा पोलिसांनी पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी कारंजा येथील रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. घटनास्थळी मुसळे यांच्या दुचाकीचे इंडिकेटर तसेच काही भाग तुटलेल्या अवस्थेत आढळून आला. मात्र, घटनास्थळी अन्य कोणतेही वाहन आढळून आले नसल्याची माहिती आहे. तसेच मृतदेह रस्त्याच्या एका बाजूला आणून ठेवलेल्या अवस्थेत असल्याचेही दिसून आले. मुसळे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसून आले.

अपघात नेमका कशामुळे झाला, त्यात अन्य वाहनाचा सहभाग होता का आणि अपघातानंतर मृतदेह रस्त्याच्या बाजूला कसा पोहोचला, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. या संपूर्ण घटनेचा तपास कारंजा पोलीस स्टेशनकडून सुरू असून तपासानंतरच अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

राज्यातील शेत व पाणंद रस्त्यांचे डिजिटल मॅपिंग करून 'महापाणंद ग्रिड' उभारणार

मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अभियानाचा शुभारंभ

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीपर्यंत बारमाही, सुरक्षित आणि सुलभ संपर्क सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महसूल व भूमी अभिलेख विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्तेयोजना – शेत सेतू : महापाणंद गतीशक्ती' या विशेष अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच मंत्रिमंडळातील इतर मंत्री उपस्थित होते. या अंतर्गत राज्यातील शेत व पाणंद रस्त्यांचे डिजिटल मॅपिंग करून 'महापाणंद ग्रिड' उभारली जाणार आहे.

राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत

मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्तेयोजनेअंतर्गत 'शेत सेतू : महापाणंद गतीशक्ती' अभियान

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना दीर्घकालीन संपर्क सुविधेची हमी देणे आणि मोबाईल ?पच्या माध्यमातून थेट सेवा उपलब्ध करून देणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आकारास आलेली ही योजना केवळ शासकीय उपक्रम न राहता जनआंदोलन बनावे, यासाठी सेवा सप्ताहात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिकांनी नव्याने सुरू करण्यात आलेल्या मोबाईल ?पद्वारे सूचना व अभिप्राय नोंदवावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

या अभियानाअंतर्गत गावठाण, मुख्य रस्ते आणि शेतजमिनी यांना जोडणाऱ्या पाणंद रस्त्यांचे जाळे अधिक सक्षम करण्यात येणार आहे. शेतमाल, बियाणे, खते तसेच कृषी यंत्रसामग्री शेतापर्यंत पोहोचविण्यासाठी दळणवळण व्यवस्था अधिक सुलभ आणि किफायतशीर करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच प्रस्तावापासून काम पूर्ण होईपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता, गतिमानता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित केले जाणार आहे.

राज्यातील सुमारे चार लाख शेत व पाणंद रस्त्यांचे डिजिटल नेटवर्क 'इंटेलिजंट वर्क्स मॅनेजमेंट सिस्टीम' (आयडब्लूएमएस) मध्ये समाविष्ट करण्यात आले असून, उपग्रह प्रतिमांच्या साहाय्याने त्यांचे भौगोलिक स्थान सार्वजनिक पोर्टलवर पाहता येणार आहे.

या एकात्मिक डिजिटल प्रणालीद्वारे प्रकल्प निर्मिती, अंदाजपत्रक, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता, कार्यादेश, ई-मेझरमेंट बुक आणि ई-बिलिंग यांसह सर्व टप्प्यांचे व्यवस्थापन करण्यात येणार आहे.

सेवा सप्ताहादरम्यान ग्रामसभांद्वारे जनजागृती, प्राधान्य रस्त्यांची निवड, विनाशुल्क सीमांकन, अतिक्रमणमुक्तीची कार्यवाही तसेच नागरिक सहभाग वाढविण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. राज्यातील सुमारे २८ हजार ग्रामपंचायतींमधून अंदाजे ५० हजार रस्ते आयडब्लूएमएस प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

याच वेळी शेतकरी तक्रार व अभिप्राय मोबाईल ॲपचाही शुभारंभ करण्यात आला. या ?पच्या माध्यमातून शेतकरी फोटो, व्हिडिओ आणि जीपीएस स्थानासह थेट तक्रारी व अभिप्राय नोंदवू शकणार आहेत.

ग्रामीण भागात शाश्वत पायाभूत सुविधा निर्माण करून शेतकऱ्यांच्या दळणवळणाच्या समस्या कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

सेलू येथे देवतारे पेट्रोल पंपाजवळ दुचाकीचा अपघात; युवकाचा मृत्यू



सेलू : सेलू तालुक्यातील देवतारे पेट्रोल पंपाजवळ सायंकाळी ७.१५ वाजता झालेल्या दुचाकी अपघातात रितेश गजानन कुदमते (वय ३०) यांचा मृत्यू झाला. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक होती. मिळालेल्या माहितीनुसार, रितेश कुडमते हे खडकी येथून पत्नीला आणण्यासाठी दुचाकीने सेलूकडे येत होते. त्यांची दुचाकी क्रमांक श्प ३२ ॅ ६९२२३ (होंडा युनिकॉन) ही देवतारे पेट्रोल पंपाजवळ आली असता अपघात झाला. अपघाताचा मोठा आवाज झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत त्यांना अपघातस्थळी उपस्थित असलेल्या लोकांच्या मदतीने तातडीने ग्रामीण रुग्णालय, सेलू येथे उपचारासाठी आणण्यात आले. मात्र, कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले.

या अपघाताची नोंद सेलू पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अपघात नेमका कशामुळे झाला याचा पुढील तपास सेलू पोलीस करीत आहेत.

समता नगरातून ८० हजारांची मोपेड चोरीला

वर्धा : शहरातील समता नगर परिसरातून घरासमोर उभी केलेली सुझुकी बर्गमन मोपेड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. या मोपेडची किंमत ८० हजार रुपये आहे.

चेतना किशोर भगत (४५), रा. समता नगर यांनी वर्धा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या पतीच्या नावावर असलेली पांढऱ्या रंगाची सुझुकी बर्गमन (क्र. एमएच ३२ एटी ७१३३) त्यांचा मुलगा तन्मय भगत वापरत होता. ८ सप्टेंबर रोजी रात्री आठ वाजता तन्मयने नेहमीप्रमाणे मोपेड घरासमोरील रस्त्याच्या कडेला उभी केली. दुसऱ्या दिवशी दुपारी ती जागेवर आढळून आली नाही.

परिसरात शोध घेऊनही मोपेडचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर १४ सप्टेंबर रोजी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

चिमुकल्या हातांनी साकारला गणराय; साडेतीन वर्षांच्या हिंदवीच्या कलाकृतीचे कौतुक



आष्टी (शहीद): गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. याच उत्साहात येथील क्रांती ज्ञानपीठ इंग्लिश मीडियम स्कूलच्या नर्सरी वर्गात शिकणाऱ्या अवघ्या साडेतीन वर्षांच्या हिंदवी विवेक ढवळे हिने आपल्या चिमुकल्या हातांनी क्लेपासून गणरायाची सुंदर प्रतिमा साकारून आपल्या कलागुणांची अनोखी झलक दाखवून दिली.

हिंदवीने अत्यंत कौशल्याने आणि कल्पकतेने क्लेचा वापर करून गणरायाची आकर्षक मूर्ती तयार केली. वयाने लहान असतानाही एखाद्या अनुभवी कलाकाराप्रमाणे तिने मूर्तीला आकार देत केलेले हे काम पाहून तिच्या कलेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

चिमुकल्या हातांनी घडविलेला हा गणराय तिच्या

क्लेपासून गणेशमूर्ती साकारत चिमुकल्या कलाकाराने दाखवली कल्पकता

सर्जनशीलतेसोबतच निरीक्षणशक्ती आणि कल्पनाशक्तीचीही प्रचिती देणारा ठरला आहे. हिंदवीच्या या आगळ्यावेगळ्या कलाकृतीने शाळेतील शिक्षक, पालक आणि उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

लहान वयातच कला आणि सर्जनशीलतेची आवड जोपासणाऱ्या हिंदवीच्या या उपक्रमाचे कौतुक होत असून, तिच्या कलागुणांना योग्य प्रोत्साहन मिळाल्यास भविष्यात ती निश्चितच आपल्या कलेची वेगळी ओळख निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सेवा संकल्प अभियानातून आदिवासी बांधवांचे वनहक्कविषयक प्रश्न निकाली काढावेत – मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



मुंबई, दि. १५ : केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत आदिवासी बांधवांचे वनहक्कविषयक प्रलंबित प्रश्न प्राधान्याने आणि कालबद्ध पद्धतीने निकाली काढावेत, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

सेवा संकल्प अभियानाच्या अंमलबजावणीसंदर्भात मंत्रालयात आदिवासी विकास मंत्री यांच्या समिती कक्षात आयोजित बैठकीत मंत्री बावनकुळे बोलत होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले, अभियानादरम्यान पात्र आदिवासी बांधवांना वनहक्कपट्ट्यांचे वितरण करावे. यापूर्वी वितरित केलेल्या पट्ट्यांमधील त्रुटी दुरुस्त करून संबंधितांना ७/१२ नमुने उपलब्ध करून द्यावेत. आदिवासी बांधवांच्या मालमत्तांचे प्रॉपर्टी कार्ड तयार करण्याची कार्यवाहीही प्राधान्याने पूर्ण करावी.

वनहक्कपट्ट्यांच्या नियमितीकरणाबाबत एमआरसॅकच्या उपलब्ध डेटाचा वापर करून निर्णय घ्यावा. ग्रामस्तरीय समित्यांनी मंजूर केलेले वनपट्ट्यांबाबत प्राप्त दावे व हरकतींचे नियमानुसार पुनर्विलोकन करावे. अन्नसुरक्षा समित्यांची स्थापना करण्याची कार्यवाहीही तातडीने पूर्ण करावी. मंत्रालय स्तरावर उपविभागीय अधिकारी यांची बैठक घेऊन संबंधित आमदारांना अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती द्यावी, अशा सूचनाही मंत्री बावनकुळे यांनी दिल्या.

आदिवासी विभागाच्या आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांची २८ सप्टेंबर रोजी आरोग्य तपासणी करावी –

आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक बुईके

आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची २८ सप्टेंबर रोजी आरोग्य तपासणी करण्यात यावी. प्रत्येक विद्यार्थ्याचे आरोग्य कार्ड तयार करून त्यांच्या आरोग्यविषयक नोंदी अद्ययावत ठेवाव्यात. तपासणीत निदर्शनास येणाऱ्या आजारांवर आवश्यक उपचार आणि पुढील कार्यवाही सुनिश्चित करावी, असे मंत्री प्रा. बुईके यांनी सांगितले.

भागातील संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी २२ सप्टेंबरपर्यंत स्थानिक आमदारांसोबत बैठक घ्यावी. अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची सविस्तर माहिती त्यांना देऊन लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा अंमलबजावणीत समावेश करावा.

राणी दुर्गावती यांच्या जयंतीनिमित्त ५ ऑक्टोबर रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. या कार्यक्रमांना संबंधित लोकप्रतिनिधींना निमंत्रित करावे. आदिवासी विकास विभागाच्या योजना तसेच शैक्षणिक आणि सामाजिक योजनांची माहिती देणारे चित्ररथ १६ सप्टेंबरपासून विविध भागांत प्रचार-प्रसिद्धी करणार आहेत. या चित्ररथांना संबंधित लोकप्रतिनिधींच्या हस्ते हिरवा झेंडा दाखविण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीला राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार मंजुळा गावित, डॉ. किरण लहामाटे, आमश्या पाडवी, राजू तोडसाम, दिलीप बोरसे, रामदास मसराम, हिरामण खोसकर, नितीन पवार, डॉ. मिलिंद नरोटे, संजय पुराम, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे आणि आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे उपस्थित होते.

आदिवासी आयुक्त गोपीचंद कदम तसेच अपर आदिवासी आयुक्त आणि प्रकल्प अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.